दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

# वाल्मिक कराड अडकणार?

## सुनावणी:उज्ज्वल निकमांचा कोर्टात पुरावा

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आजच्या सुनावणीत मोठ वळण पाहायला मिळालं. सरकारी पक्षाच्यावतीने विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा व्हिडीओ पुरावा सादर केला. यामुळे प्रमुख आरोपी वाल्मिक कराडवरचा फास अधिक घट्ट झाला आहे. बीड जिल्हा व सत्र न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत कोर्टाने पुढील तारीख २४ एप्रिल निश्चित केली. न्यायालयात फॉरेन्सिक लॅबमधून आलेले सीलबंद पुरावे सादर करण्यात आले असून, ते तपासून पुढील सुनावणीत सादर केले जाणार आहेत. दरम्यान, वाल्मिक कराडच्या संपत्ती जप्तीचा अर्ज देखील न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

### माझ्या विरोधात पुरावा नाही, कराडचा दावा

आजच्या सुनावणीत वाल्मिक कराडने माझ्या विरोधात कोणताही ठोस पुरावा नाही. मला निर्दोष ठरवण्यात यावे, अशी मागणी केली. मात्र, उज्ज्वल निकम यांनी कोर्टात सादर केलेल्या व्हिडीओमुळे त्याचा दावा फारसा ठोस न ठरता बचावात अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. आरोपींविरोधात अद्याप आरोप निश्चित झालेले नाहीत. निकम यांनी यावेळी पत्रकार परिषदेत स्पष्ट केलं की, मोक्का कायद्यानुसार कराडची संपत्ती जप्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. तसेच, सर्व आरोपींचे जबाब, सीडीआर, आणि इतर डिजिटल पुरावे देखील सादर करण्याची मागणी झाली आहे.

### मला बीड न्यायालयात शिफ्ट करा: विष्णू चाटेचा अर्ज

या प्रकरणातील दुसरा महत्त्वाचा आरोपी विष्णू चाटे याने स्वतःला बीड न्यायालयात स्थानांतर करण्याची विनंती केली आहे. तपास यंत्रणांकडून फॉरेन्सिक पुरावे सीलबंद स्वरूपात न्यायालयात ठेवण्यात आले आहेत. उज्ज्वल निकम यांच्या म्हणण्यानुसार, सीलबंद दस्तावेज तपासून पुढील कार्यवाही होणार आहे.आरोपींना व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. सरकारी पक्षाच्यावतीने उज्ज्वल निकम यांनी तर आरोपींच्या वतीने ॲड. विकास खाडे यांनी युक्तिवाद केला. प्रकरणात आता सीलबंद पुराव्यांची तपासणी आणि आरोप निश्चितीच्या प्रक्रियेवर सर्वांचं लक्ष आहे.

# बीडमध्ये कोटींचा निधी मंजूर

## खा. बजरंग सोनवणे: आरोग्याच्या उत्तम सोयी मिळणार

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:बीड लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच हेल्थ युनिटच्या स्वतंत्र आणि मजबूत इमारती असण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५व्या वित्त आयोगातून जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या बळकटीकरणासाठी २२ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला आहे.या निधीमुळे ग्रामीण व शहरी भागातील आरोग्यसेवा सुधारण्यास मोठा हातभार लागणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतींसाठी हा निधी वितरित करण्यात आला आहे. केज विधानसभा संघात २ कोटी ८३ लाख, बीड विधानसभा मतदारसंघात २ कोटी ९१ लाख, माजलगाव विधानसभा मतदारसंघात २ कोटी ३३ लाख, आष्टी विधानसभा मतदारसंघात १० कोटी ८२ लाख, परळी विधानसभा मतदारसंघात १ कोटी १७ लाख तर गेवराई विधानसभा मतदारसंघात २ कोटी ३३ लाख रूपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीमधून प्रस्तावित करण्यात आलेली कामे विहित वेळेच्या आत व निश्चित करण्यात आलेल्या दर्जानुसार पूर्ण होतील अशी माहिती खा.बजरंग सोनवणे यांनी » पान २ वर

# नुकसानीचे पंचनामे करावेत

## तत्पर:मंत्री पंकजा मुंडेंचे निर्देश

पुण्यभूमी प्रतिनिधी



जालना:अकोला (ता. बदनापूर) गावातील मठवाडी परिसरात आज दुपारी अचानक लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या धान्य पिकांचे तसेच जखमी पशूंचे तातडीने पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी असे आदेश राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिले आहेत. या घटनेची संपूर्ण माहिती जाणून घेत पालकमंत्र्यांनी या घटनेविषयी हळहळ व्यक्त केली आहे.

अकोला गावातील गट क्रमांक ४१ मधील मठवाडी परिसरात आज दुपारी पोलवरील विजेच्या तारांचे घर्षण होऊन अचानक आग लागली. या आगीमुळे » पान २ वर






# आका'ची टोळी अजूनही कार्यरत

## आ सुरेश धस : वाल्मीक कराडची ED चौकशी होणार असल्याचेही दिले संकेत

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड : भाजप आमदार सुरेश धस यांनी वाल्मीक कराडची टोळी आजही बीड जिल्ह्यात सक्रिय असल्याचा दावा केला आहे. 'आका'ची टोळी आजही कार्यरत आहे. एसीपी नवीन आहेत. त्यांना याची माहिती नाही. या लोकांनी यापूर्वी वॉचमनला मारहाण केली. त्यातून हे सर्वकाही घडले, असे ते म्हणालेत. मस्साजोग येथील आवादा कंपनीत २ दिवसांपूर्वी १२ लाख रुपयांच्या केबलची चोरी झाली होती. चोरट्यांनी कंपनीच्या वॉचमनला बांधून टाकून ही चोरी केली. या प्रकरणावरून आता राजकीय आरोप प्रत्यारोप सुरू झालेत. सुरेश धस यांनी या प्रकरणी भाष्य करताना आकाची टोळी अजूनही जिल्ह्यात सक्रिय असल्याचा दावा केला. ते आज पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, या लोकांनी दलित समाजाच्या वॉचमनला मारहाण केली होती. आताही आकाच्याच एआखाद्या सहकाऱ्याने हे काम केले असेल. दोन दिवसांत आरोपी सापडेल. त्यांची टोळी आजही सक्रिय आहे. आकाने जागोजागी आपले लोक ठेवलेत. ते आजही आपले काम करत आहेत. त्यांच्या बदल्या झाल्या नाहीत. ते त्रासदायक आहेत.

सुरेश धस यांनी यावेळी संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वाल्मीक कराडची ईडी चौकशी करण्याचेही संकेत दिलेत. वाल्मीक कराड संदर्भात अजून बरेच काही सापडणार आहे. या प्रकरणी ईडीही चौकशी करणार आहे. ईडीने यापूर्वीच त्याला नोटीस बजावली होती. त्यात सर्वकाही सापडेल, असे ते म्हणाले. धस यांनी यावेळी परळीतील औष्णिक विद्युत प्रकल्पातील राख उचलण्यासाठी पोलिसांनी आपल्या गाड्या लावल्याचाही आरोप केला. राख उचलण्यासाठी पोलिसांनी आपल्या स्वतःच्या गाड्या लावल्या आहेत. कुणाचे टीप्पर, तर तर कुणाचा जेसीबी आहे, असे धस म्हणाले. दुसरीकडे, मस्साजोगचे सरपंच संतोष देसमुख हत्या प्रकरणाची आज सुनावणी झाली. त्यात सरकारी वकिलांनी देशमुखांना आरोपींनी केलेल्या मारहाणीचा व्हिडिओ कोर्टात सादर केला. तसेच हा व्हिडिओ बाहेर येऊ नये याची काळजी घेण्याची विनंतीही यावेळी कोर्टाला करण्यात आली. हा व्हिडिओ » पान २ वर

# मास्टरमाइंड तहव्वूर राणाला १८ दिवसाची कोठडी



मुंबई : मुंबईवरील २६/११च्या हल्लयाचा मास्टरमाइंड तहव्वूर राणा याला अखेर आज रात्री पटियाला हाऊस कोर्टात हजर करण्यात आलं. विमानतळावर आल्यानंतर राणाला अडीच तासानंतर कोर्टात आणण्यात आलं. त्यानंतर कोर्टात सुनावणी सुरू झाली. यावेळी एनआयएच्या वकिलांनी राणाची २० दिवसाची कोठडी मागितली. राणाच्या कोठडीची कारणंही वकिलाने कोर्टासमोर मांडली. तसेच राणा हा आंतरराष्ट्रीय दहशतवादी असल्याने काही पुरावे आणि तथ्य मिळवण्यासाठी त्याची कोठडी हवी आहे, असा युक्तिवाद एनआयएच्या वकिलांनी केला. कोर्टाने हा युक्तिवाद ग्राह्य धरून राणा याला १८ दिवसाची कोठडी दिली आहे.

तहव्वूर राणाला पटियाला हाऊस कोर्टात आणण्यात आलं. यावेळी एनआयएच्या वकिलाने राणाला २० दिवसाची कोठडी देण्याची मागणी केली. सुनावणीच्यावेळी एनआयएच्या वकिलांनी खटल्याशी संबंधित काही तथ्य समोर ठेवले. सुनावणी बंद खोलीत झाली. कोर्टात तहव्वूर राणा, लीगल सर्व्हिस ऑथॉरिटीने दिलेला त्याचा वकील आणि एनआयएच्या लीगल टीमसह जज आणइ कोर्टाचा स्टाफ उपस्थित होता. एनआयएकडून » पान २ वर

# परळीत विद्यार्थी प्रबोधन मेळावा

## नियोजन:महापुरुषांच्या जयंतीचा उपक्रम



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:क्रांतीसुर्य महात्मा फुले व महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आज दिनांक ११ एप्रिल रोजी परळी शहरात विद्यार्थी प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात काही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

शहरातील पत्रकार भवन येथे शुक्रवार दिनांक ११ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता होणाऱ्या विद्यार्थी प्रबोधन मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्रातील ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ पत्रकार व साहित्यिक भीमयुगकार रानबा गायकवाड हे आहेत. कार्यक्रमास जेष्ठ नेते माधवराव ताटे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, सामाजिक कार्यकर्ते उत्तम माने ,माजी उपनगराध्यक्ष आयुब खान पठाण, सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथराव गायकवाड ,परळी नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ सावंत , प्रसिद्ध विचारवंत अजयकुमार गंडले,लेखक, दिग्दर्शक प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे , सामाजिक कार्यकर्ते » पान २ वर

## हिंदू राष्ट्राच्या मागणीसाठी

'गर्व से कहो हम हिंदू है' असा जयघोष काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपण ऐकतो. भारत हा हिंदू राष्ट्र व्हावा अशी इच्छा असलेला मोठा वर्ग आपल्या देशात आहे. या हिंदुत्ववादी विचारांच्या आधारावर काम करणाऱ्या भाजपाला केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तीन वेळा सत्ता मिळाली. भारतातील हिंदूंना आपली बाजू ठामपणे मांडणारा पक्ष हवा होता. ती पोकळी भरून काढण्यात भाजपाला यश आले, असे म्हणायला हरकत नाही.त्यातूनच, अयोध्येतील राम मंदिराचा गेले अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न असो नाही, तर कश्मीरमधील ३७० कलमाचा मुद्दा असो. शेजारील देशांनीही असे ठळक मुद्दे मोदी सरकारच्या कार्यकाळात कसे निकाली निघाले, हे पाहता आले आहे. नेपाळ हा भारताचा शेजारील मित्र राष्ट्र ओळखला जातो. ८१ टक्के हिंदू लोकसंख्या असलेल्या नेपाळमध्ये सध्या सुरू झालेल्या हिंदू राष्ट्राच्या नवीन आंदोलनामुळे त्याला जगभर प्रसिद्धी मिळत आहे. राजेशाही पुन्हा आणावी, हिंदू राष्ट्र घोषित करावे, यासाठी मोठ्या संख्येने समर्थक रस्त्यावर उतरत आहेत. माजी राजे ज्ञानेंद्र शाह यांना पुन्हा राजगादीवर बसवावे या मागणीला जोर धरला आहे.

नेपाळमधील २४० वर्षे जुन्या हिंदू राजेशाहीचे अस्तित्व नेपाळ संसदेने २००८ मध्ये समाप्त केले होते. नेपाळला धर्मनिरपेक्ष सार्वभौम राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले होते. राजे ज्ञानेंद्र शाह यांना परागंदा व्हावे लागले होते. अर्थात हा सर्व प्रकार चीनच्या इशाऱ्यावरून करण्यात आला. भारताचा एक मित्रराष्ट्र कमी करण्याचा चीनचा सुप्त हेतू होता. नेपाळची सत्ता उलटून लावण्यासाठी १९९० सालापासून नेपाळमध्ये धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याची मागणी जोर धरली होती; परंतु ही कार्यकारी राजेशाही उलथून संविधानिक राजेशाहीसह संसदीय लोकशाही स्थापित करण्यासाठी १८ वर्षांचा काळ लोटला गेला.

नेपाळमध्ये हिंदू, बौद्ध, मुस्लीम, ख्रिश्चन आणि इतर अनेक धार्मिक समुदाय आहेत. नेपाळ हा जगातील एकमेव असा देश आहे, जिथल्या लोकसंख्येत हिंदूंचा टक्का भारतापेक्षा अधिक आहे. या देशात अनेक सुंदर आणि स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेली मंदिरे आहेत. नेपाळची सांस्कृतिक आणि धार्मिक ओळख वाचवण्यासाठी राजेशाही आवश्यक आहे. जनता धर्मनिरपेक्ष सरकारवर खूश नाही, असा आंदोलनकर्त्यांचा दावा आहे. अनेक पौराणिक कथांशी नेपाळची जनता आजही स्वत:ला जोडू पाहते. एका कथेनुसार, भगवान विष्णूने नेपाळी लोकांना संघटित केले होते आणि त्यांना त्यांचा ध्वज दिला होता, ज्यावर सूर्य आणि चंद्र असे प्रतीक होते. इतिहासकाराच्या मते, नेपाळ या नावाची सुरस कथाही आहे. ने नावाच्या एका हिंदू ऋषीने प्रागैतिहासिक काळात काठमांडूच्या खोऱ्यात स्वतःची स्थापना केली. नेपाळ या शब्दाचा अर्थ म्हणजे ने ऋषींनी संरक्षित केलेले स्थान (संस्कृतमध्ये पाल) असा होतो. त्यांनी बागमती आणि विष्णुमती नद्यांच्या संगमावर असलेल्या टेकू येथे धार्मिक विधी केले. पौराणिक कथेनुसार, त्यांनी गोपाल राजवंशातील अनेक राजांपैकी पहिला म्हणून एका धार्मिक गोपाळाची निवड केली. या शासकांनी नेपाळवर ५०० वर्षांहून अधिक काळ राज्य केले. गोपाल राजवंशाच्या वंशातील पहिला राजा म्हणून भुक्तमानची निवड केली. गोपाल राजवंशाने ६२१ वर्षे राज्य केले. यक्ष गुप्त हा या राजवंशाचा शेवटचा राजा होता. १८ व्या शतकाच्या मध्यात, पृथ्वी नारायण शाह या गुरखा राजाने सध्याचे नेपाळ बनलेले राज्य एकत्र करण्यासाठी मोहीम आखली होती. त्याने सीमावर्ती पर्वतीय राज्यांची तटस्थता सुनिश्चित करून आपले ध्येय गाठले. अनेक रक्तरंजित लढाया आणि वेढा घालण्यानंतर, विशेषतः कीर्तिपूरची लढाई १७६९ मध्ये काठमांडू खोरे जिंकण्यात यश मिळवले होते. हिंदू धर्म हा नेपाळचा सर्वात मोठा धर्म आहे. काठमंडू खोऱ्यावरील गुरखाली विजयानंतर, राजा पृथ्वी नारायण शाह यांनी पाटणमधून ख्रिश्चन मिशनऱ्यांना हाकलून लावले आणि नेपाळला अस्सल हिंदुस्थान असे नाव दिले होते. गुरखाली राजा पृथ्वी नारायण यांच्या काठमांडू खोऱ्यावरील विजयानंतर, उच्च वर्गीकरणाचे हिंदू धागे परिधान केलेल्या तगधारींना नेपाळच्या राजधानीत विशेषाधिकार प्राप्त झाले होते. तसेच केंद्रीय सत्तेतही अधिक सहभाग मिळाला होता. तेव्हापासून हिंदू करण हे नेपाळ राज्याचे महत्त्वाचे धोरण बनले होते. नेपाळी समाज त्याच्या आंतरधर्मीय धार्मिक सौहार्द आणि सहिष्णुतेसाठी ओळखला जात असला तरी पृथ्वी नारायण शाह यांनी नेपाळच्या हिंदू करणासाठी इतर धार्मिक समुदायांवर छळ केल्याचा इतिहास आहे. त्यानंतर नेपाळमध्ये १९४०पर्यंत हिंदू धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्माचा प्रसार करण्यास मनाई होती. नेपाळच्या नव्या राज्यघटनेनुसार, तो धर्मनिरपेक्ष राज्य आहे. कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य देत नाही, असा उल्लेख आहे. यामुळेच नेपाळमध्ये धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याचा प्रयोग यशस्वी झाला नाही, कारण नेपाळच्या राज्यघटनेत धर्मनिरपेक्षतेची व्याख्या 'अनादी काळापासून चालत आलेल्या धर्म आणि संस्कृतीच्या संरक्षणासह धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य' अशी केली आहे, जी हिंदू धर्माला विशेष स्थान देत आहे. त्यामुळे, राज्यघटनेत धर्मनिरपेक्ष राज्याचा दर्जा देत लोकशाही प्रक्रियेतून सरकार स्थापन करण्यात येत असले तरी जनतेतील राजेशाहीचा मुकुट हवा आहे. त्याचबरोबर रस्त्यावर उतरलेली जनता पुन्हा हिंदू राष्ट्राची निर्मिती करण्यात यशस्वी ठरते का हे पाहावे लागेल.

# शतकानुशतके घुमणारा एल्गार!

महात्मा जोतीराव गोविंदराव फुले हे केवळ एक युगपुरुष नव्हते, तर ते एक अत्यंत प्रभावी समाजसुधारक, विचारवंत आणि लेखकही होते. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील रूढ अंधश्रद्धा, जातीय भेद आणि अन्यायकारक प्रथांवर कठोर प्रहार केले. 'तृतीय रत्न' हे त्यांचे १८५५ मध्ये प्रकाशित झालेले महत्त्वपूर्ण सामाजिक नाटक याच प्रयत्नांचा ज्वलंत भाग आहे. हे नाटक तत्कालीन सामाजिक वास्तवाचे भेदक चित्रण करते आणि ब्राह्मणी पुरोहितशाहीच्या शोषणावर व समाजाला पोखरणाऱ्या अज्ञानावर कठोर टीका करते. 'तृतीय रत्न'चा चिकित्सक अभ्यास करणे आजच्या परिस्थितीतही अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण या नाटकाने उपस्थित केलेल्या अनेक सामाजिक समस्या आजही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपल्या समाजात अस्तित्वात आहेत. 'तृतीय रत्न' या नाटकाचा चिकित्सक अभ्यास करून त्याच्या सामाजिक, ऐतिहासिक आणि समकालीन महत्त्वाचा शोध घेणे कालसुसंगत आहे.

नाटकाचा सामाजिक–ऐतिहासिक संदर्भ:–

'तृतीय रत्न' ज्या काळात साकारले, तो काळ महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासातील एक निर्णायक टप्पा होता. पेशवाईच्या पतनानंतर ब्रिटिश राजवट स्थिर झाली असली तरी, समाजातील जातीय उतरंड आणि धार्मिक कर्मकांडांचे निर्विवाद वर्चस्व अजूनही कायम होते. ब्राह्मणी पुरोहितशाहीने समाजात आपले मजबूत स्थान टिकवून ठेवले होते आणि ती सामान्य जनतेचे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक शोषण करत होती. स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र शिक्षणाच्या प्रकाशापासून पूर्णपणे वंचित होते आणि त्यांना अनगिनत सामाजिक बंधनांच्या जाळ्यात जखडले गेले होते. याच अन्यायकारक पार्श्वभूमीवर महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाजाला अन्यायविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि जागृत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले. 'तृतीय रत्न' हे नाटक त्यांच्या याच व्यापक सामाजिक प्रबोधनाच्या उदात्त कार्याचा एक अविभाज्य भाग आहे.

नाटकाचे कथानक आणि पात्रयोजना:–

'तृतीय रत्न' हे एक संक्षिप्त परंतु अत्यंत प्रभावी नाटक आहे, ज्यामध्ये मर्यादित परंतु बोलकी पात्रे आहेत. नाटकाची कथा एका गरीब आणि निष्पाप शेतकरी कुटुंबाच्या भोवती फिरते. हे कुटुंब धार्मिक कर्मकांडांवर आणि गावातल्या पुरोहितांच्या शब्दांवर पूर्णपणे विश्वास ठेवते. याच गावात एक धूर्त आणि स्वार्थी पुरोहित (भट) वास्तव्यास असतो, जो या कुटुंबाच्या अज्ञानाचा आणि गाढ श्रद्धेचा निर्दयपणे गैरफायदा घेतो. तो वेगवेगळ्या धार्मिक विधींच्या नावाखाली त्यांच्याकडून वारंवार पैसे उकळतो आणि त्यांना कायमस्वरूपी अंधश्रद्धेच्या गर्तेत ढकलून ठेवतो.

'नाटकातील प्रमुख पात्रे' खालीलप्रमाणे आहेत:

'शेतकरी:' गरीब, प्रामाणिक परंतु भोळा आणि धार्मिक वृत्तीचा माणूस, जो पुरोहितांच्या कपटपूर्ण फसवणुकीला सहज बळी पडतो.'शेतकऱ्याची पत्नी:' आपल्या पतीप्रमाणेच धार्मिक आणि कोणतीही शहानिशा न करता अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारी स्त्री.

'पुरोहित (भट)': अत्यंत धूर्त, स्वार्थी आणि समाजातील गरीब व अशिक्षित लोकांचे शोषण करणारा धार्मिक पुढारी, जो आपल्या स्वार्थासाठी धर्माचा गैरवापर करतो. 'ख्रिस्ती धर्मोपदेशक:' आधुनिक विचारांनी प्रेरित आणि सत्यशोधक समाजाच्या प्रगतीशील विचारांनी प्रभावित झालेला एक जागरूक तरुण, जो शेतकऱ्याला आणि त्याच्या कुटुंबाला समाजातील सत्य परिस्थितीची जाणीव करून देतो आणि त्यांना अज्ञानाच्या अंधारातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो.नाटकाची कथा पुरोहितांच्या कपटकारस्थानांभोवती आणि त्यातून गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबाला सोसाव्या लागणाऱ्या असह्य आर्थिक आणि मानसिक त्रासाभोवती फिरते. जेव्हा शिक्षित तरुण त्यांच्या जीवनात प्रवेश करतो आणि त्यांना सत्य परिस्थितीची जाणीव करून देतो व अंधश्रद्धेपासून दूर राहण्याचा मोलाचा सल्ला देतो, तेव्हा नाटकाला एक महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक वळण मिळते. नाटकातील प्रमुख सामाजिक विचार:–'तृतीय रत्न' या नाटकात महात्मा फुले यांनी अनेक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी सामाजिक विचारांना प्रभावीपणे वाचा फोडली आहे. हे नाटक पुरोहितशाहीच्या समाजाला पोखरणाऱ्या शोषणावर केलेली एक कठोर टीका आहे. पुरोहित धार्मिक विधींच्या नावाखाली गरीब आणि अशिक्षित लोकांकडून अमाप पैसे उकळतात आणि त्यांचे निर्दय आर्थिक शोषण करतात. महात्मा फुले यांनी नाटकात पुरोहितांना 'ढोंगी' आणि 'पाखंडी' म्हणून अत्यंत प्रभावीपणे चित्रित केले आहे. हे नाटक समाजात खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धा आणि अज्ञानाच्या अंधकारमय जगावर प्रकाश टाकते. धार्मिक कर्मकांड आणि रूढींच्या नावाखाली सामान्य लोकांना कशा प्रकारे फसवले जाते, याचे हृदयद्रावक चित्रण या नाटकात आहे. शिक्षणाच्या अभावामुळे लोक पुरोहितांच्या बोलण्यावर कोणताही विचार न करता सहजपणे विश्वास ठेवतात, हे सत्य महात्मा फुले यांनी अत्यंत स्पष्टपणे दाखवले आहे.

नाटकातील सुशिक्षित तरुण(ख्रिस्ती धर्मोपदेशक) शिक्षणाचे अमूल्य महत्त्व प्रभावीपणे पटवून देतो. शिक्षणामुळे लोकांना सत्य आणि असत्य यांच्यातील भेद स्पष्टपणे कळतो आणि त्यामुळे ते कोणत्याही प्रकारच्या शोषणाला बळी पडत नाहीत, असा महत्त्वपूर्ण विचार महात्मा फुले यांनी या नाटकातून मांडला आहे. 'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली' हे त्यांचे अजरामर वचन याच महत्त्वपूर्ण विचारांना अधिक बळकटी देते.जरी हे नाटक थेट जातीय भेदभावावर केंद्रित नसले तरी, पुरोहितशाहीचे समाजात असलेले निर्विवाद वर्चस्व आणि शूद्रातिशूद्रांचे होणारे असह्य शोषण हे त्या काळातील जातीय व्यवस्थेचेच अपरिहार्य अंग होते. त्यामुळे अप्रत्यक्षपणे परंतु अत्यंत प्रभावीपणे या नाटकाच्या माध्यमातून जातीय भेदभावावरही कठोर टीका केली जाते.महात्मा फुले यांनी समाजातील लोकांना कोणतीही गोष्ट डोळे झाकून न स्वीकारता तार्किक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारण्याचे कळकळीचे आवाहन केले आहे. नाटकातील सुशिक्षित तरुण याच प्रगतीशील दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करतो.

नाटकाचे वाङ्मयीन मूल्यमापन:– 'तृतीय रत्न' या नाटकाची भाषा अत्यंत साधी, सोपी आणि सामान्य माणसांना सहजपणे आकलन होणारी आहे. महात्मा फुले यांनी दैनंदिन जीवनातील लोकभाषेचा अत्यंत प्रभावी वापर केला आहे, ज्यामुळे हे नाटक त्या काळातील सामान्य जनतेपर्यंत थेट



प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे
मो.९८२२८३६६७५

पोहोचण्यास मदत झाली. नाटकातील संवाद थेट, स्पष्ट आणि रोखठोक आहेत, ज्यामुळे पुरोहितशाहीवरील त्यांची तीव्र टीका अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचते. या नाटकामध्ये विनोदी आणि उपरोधिक शैलीचाही अत्यंत कुशलतेने वापर केला आहे, ज्यामुळे गंभीर सामाजिक विषयांनाही सहजपणे हाताळता आले आहे आणि ते अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचले आहेत.

'तृतीय रत्न'चे महत्त्व आणि त्याची समकालीनता:–

'तृतीय रत्न' हे नाटक केवळ त्या काळातील समाजाचे वास्तववादी चित्रण करणारे एक ऐतिहासिक महत्त्वाचे दस्तावेज नाही, तर ते आजही अनेक महत्त्वपूर्ण अर्थांनी अत्यंत महत्त्वाचे आणि समकालीन आहे. आजही आपल्या समाजात अनेक प्रकारच्या हानिकारक अंधश्रद्धा आणि धार्मिक कर्मकांड मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहेत, ज्यांच्या माध्यमातून आजही गरीब आणि अशिक्षित लोकांचे निर्दय शोषण केले जाते. 'तृतीय रत्न' आजही या सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्याची आणि लढण्याची महत्त्वपूर्ण प्रेरणा देते. शिक्षणाचे महत्त्व आजही निर्विवाद आणि अपरिवर्तनीय आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीला योग्य आणि अयोग्य, सत्य आणि असत्य यांच्यातील सूक्ष्म फरक कळतो आणि त्यामुळे तो कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीला बळी पडत नाही. 'तृतीय रत्न' शिक्षणाच्या याच अनमोल महत्त्वाची आजही आपल्याला जाणीव करून देते.जरी आज पुरोहितशाहीचे स्वरूप काही प्रमाणात बदलले असले तरी, धार्मिकतेच्या नावाखाली भोळ्याभाबड्या लोकांचे शोषण करण्याचे अनेक प्रकार आजही समाजात मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. 'तृतीय रत्न' अशा सर्व धोकेदायक प्रवृत्तींविरुद्ध आजही आपल्याला सावध राहण्याचा महत्त्वपूर्ण संदेश देते.'तृतीय रत्न' सामाजिक प्रबोधनाच्या शाश्वत महत्त्वावर जोर देते. समाजात वेळोवेळी सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि समाजातील अन्याय व विषमता दूर करण्यासाठी प्रभावी सामाजिक प्रबोधनाची गरज असते, हे महत्त्वपूर्ण सत्य हे नाटक आजही आपल्याला शिकवते.

तृतीय रत्न: काही मर्यादा:–'तृतीय रत्न'चा चिकित्सक अभ्यास करताना काही मर्यादा आणि टीकात्मक दृष्टिकोन विचारात घेणे आवश्यक आहे काही अभ्यासक आणि समीक्षक असा युक्तिवाद करू शकतात की या नाटकात पुरोहितांचे चित्रण काहीसे एकांगी आणि पूर्णपणे नकारात्मक आहे. समाजात सर्वच पुरोहित शोषक आणि ढोंगी नसतात, हे सत्य लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.नाटकाची कथा अतिशय सरळ आणि थेट आहे. यात नाट्यमयतेचा आणि कथानकाच्या गुंतागुंतीचा अभाव जाणवतो. तथापि, महात्मा फुले यांचा प्रमुख उद्देश सामाजिक संदेश देणे हा असल्याने त्यांनी कथेला अधिक सोपे ठेवले असावे.नाटकातील पात्रे विशिष्ट सामाजिक गटांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे काहीवेळा ती व्यक्तिमत्त्वांपेक्षा अधिक स्टिरिओ टाइप वाटू शकतात.या काही मर्यादा असूनही 'तृतीय रत्न'चे सामाजिक आणि ऐतिहासिक महत्त्व निर्विवाद आहे. हे नाटक महात्मा फुले यांच्या व्यापक सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनाचा आणि त्यांच्या प्रभावी व थेट लेखनशैलीचा एक उत्कृष्ट आणि ज्वलंत नमुना आहे. महात्मा फुले यांचे 'तृतीय रत्न' हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण सामाजिक नाटक आहे. ते तत्कालीन समाजातील खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धा, पुरोहितशाहीचे निर्दय शोषण आणि समाजाला पोखरणाऱ्या अज्ञानाचे अत्यंत प्रभावी चित्रण करते. शिक्षणाचे अनमोल महत्त्व आणि तार्किक दृष्टिकोनाची नितांत गरज यावर ते अत्यंत प्रभावीपणे जोर देते. आजही हे नाटक सामाजिक प्रबोधनाच्या कार्यासाठी आणि समाजातील शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी एक शक्तिशाली प्रेरणास्रोत आहे. याचा चिकित्सक अभ्यास करणे आपल्याला भूतकाळातील गंभीर सामाजिक समस्यांची जाणीव करून देते आणि वर्तमानातील अनेक जटिल प्रश्नांची प्रभावी उत्तरे शोधण्यास बहुमोल मदत करते. 'तृतीय रत्न' हे केवळ एक नाटक नसून ते एका महान समाजसुधारकाच्या सामाजिक परिवर्तनाच्या उदात्त ध्येयाचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग आहे.'तृतीय रत्न' शतकानुशतके घुमणारा ज्ञानाचा एल्गार आहे.

## पान एक वरून

**पत्रकारांनी सकारात्मक बातम्यांना अधिक**

बदलांना प्रसिद्धी देऊन शहराचे नावलौकिक करावे, असे डॉ. जोगदंड म्हणाले. अलीकडे प्रत्येक जण संपादक, मालक व प्रकाशक झालेला आहे. समाजमाध्यमे आणि माहितीची क्रांती यामुळे पत्रकारितेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाले आहेत. यामध्ये टिकून राहायचे असेल तर पत्रकारांना आपले वेगळेपण सिद्ध करावे लागेल, पत्रकारांनी नवे ज्ञान, नवे कौशल्य अंगीकृत करायला हवे. त्याचबरोबर आपल्या वैयक्तिक आयुष्यात पत्रकारितेबरोबरच एखादा उद्योग व्यवसाय सुरू करून स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचा सल्लाही डॉ. जोगदंड यांनी दिला. पत्रकार हा समाजाचा आरसा मानला जातो. त्याअनुषंगाने पत्रकारांच्या माध्यमातून अनेक चांगल्या गोष्टी घडू शकतात, यासाठी पत्रकारांनी जागरूकतेने व डोळसपणे काम करून समाजात स्वतःची उज्वल प्रतिमा निर्माण करावी, असे आवाहन देखील डॉ. बबन जोगदंड यांनी केले. भविष्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट, जीपीटी यासारख्या अनेक प्रणाली आल्या आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाचे तंत्रसुद्ध प्रशिक्षण सुध्दा पत्रकारांनी घेण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली.

**भगवान महावीरांचा जन्मोत्सव**

साजरा करण्यात आला. याप्रसंगी व्याख्यात्यांनी भगवान महावीरांनी आपल्या आचारणातून जगाला मार्गदर्शक ठरेल, असा अहिंसा व शांतीची शिकवण दिली. संपूर्ण जीवन सहनशीलता, कारुण्य, सहिष्णूता आणि दृढनिश्चयाचे प्रतिक असून संपूर्ण प्राणिमात्राचे कल्याण साधणारा अहिंसा परमो धर्मः हा महामंत्र महावीरांनी दिल्याचे सांगून दिला आहे. त्यामुळे प्रत्येकाने दैनंदिन जीवनात त्याचं पालन केले पाहिजे, याप्रसंगी सांगितले.

**लोणारमध्ये भव्य शोभायात्रा**

अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. शोभायात्रेच्या संपूर्ण मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडूनये म्हणून पोलीसप्रशासनाने चोखबंदोबस्त ठेवला होता. वाहतुकीच्या योग्य नियोजनामुळे कुठेही अडथळा जाणवला नाही. ठाणेदार निमिष मेहेत्रे,सहा.पोलीस निरीक्षक इंगोले, पोलीसनायक संजयजाधव,गुप्तवार्ताविभागाचे संतोष चव्हाण, विशालधोंडगे, अनिल शिंदे, आणि वाहतूक पोलीस पंढरी गीते यांनी शिस्तबद्ध व्यवस्थेसाठी विशेष मेहनत घेतली. रक्तदान शिबिरात अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत रक्तदान केले. एक थेंब रक्त – अनेकांचे जीवन या संकल्पनेवरआधारित याउपक्रमामुळेआपत्कालीन परिस्थितीत रक्ताचातुटवडाभासूनयेयासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले.

रक्त तपासणी शिबिरात नागरिकांच्या मधुमेह, रक्तदाब, हिमोग्लोबिन, थायरॉईड आदी तपासण्या करण्यात आल्या. विविध आजारांचे निदान वेळेत व्हावे व नागरिकांनी आपल्या आरोग्याबाबत सजग राहावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. शिबिरात सहभागी झालेल्या नागरिकांना मोफत तपासणी, सल्ला व काही गरजूंना मोफत औषधोपचार देखील देण्यात आले.यामुळ आर्थिकदृष्ट्यादुर्बलघटकांनाही दिलासा मिळाला. या उपक्रमासाठी विहारसेवा ग्रुपच्या सदस्यांनी अतिशय नियोजनबद्धरीत्यासंयोजनकेले.संपूर्णदिवसभरसुरू असलेल्या या शिबिरात स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध सेवा देत नागरिकांचे योग्य मार्गदर्शन केले.भगवान महावीर यांच्या अहिंसा,करुणा व सेवाभावी तत्त्वज्ञानाचे अनुकरण करत विहार सेवा ग्रुपने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून समाजाप्रती जबाबदारीचे उदाहरण निर्माण केले. या शिबिरामुळे महावीर जयंतीचे औचित्य अधिक अर्थपूर्ण ठरले.

**पुन्हा एकदा केवायसी**

मोबाईल मध्ये चशीर श–झूल ेलळश्रश रविंविवहरी षरलश ठऊ ेशीीेंळलश रि डाउनलोड करून त्याद्वारे आपली ए–झूल दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत करुन घ्यावे असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती .स्वाती शेंडे यांनी केले आहे असे कळंबचे तहसीलदार मा.हेमंत ढोकले,पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती.शिल्पा माळवे,सहाय्यक महसूल अधिकारी श्री. आर.डि.पवार यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

कळंब तालुक्यातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातील ई–पॉश मशिनद्वारे व मोबाईल प द्वारे प्रत्येक शिधापत्रिका धारक आणि कुटुंबातील सदस्यांची केवायसी करून घ्यावी फक्त आधार क्रमांक टाकून हि प्रक्रिया पूर्ण केली जाते.हि प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे रेशन बंद होऊ शकते व रेशन कार्डातून नाव वगळण्याची शक्यता आहेत जर ई केवायसी नाही केली तर याची सर्वस्वी जबाबदारी कार्डधारकांची असणार आहे त्यामुळे ३० एप्रिल २०२५ पर्यंत सर्व शिधापत्रिका धारकांनी सर्व सदस्यांचे ई– केवायसी करून घ्यावी

–शिल्पा माळवे,पुरवठा निरीक्षण तहसील कार्यालय,कळंब

**महापुरुष स्पर्धेचे पारितोषिक**

हजार विद्यार्थी बसले होते, त्यामध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा बीड शहरातील तुलसी महाविद्यालय येथे रविवार (दि.६) एप्रिल रोजी पार पडली त्यामध्ये शेकडो विद्यार्थी परीक्षेस होते.स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महापुरुष सामान्य ज्ञान समितीचे प्रमुख प्रा. अशोक गायकवाड,भारत मगर,प्राचार्य प्रदीप गाडे,सुमेध जोगदंड, ड.राजेश शिंदे, महादेव इनकर यांनी सुयोग्य नियोजन केले होते. अंतिम परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रथम शोएब शौकत आतार, प्रिती उगले, शिवानी गाडेकर, उत्तेजनार्थ तुमी उपरे, पृथ्वीराज उगले, संघवी जोगदंड, अन्वी जोगदंड यांना वितरित करण्यात आले.

**परळीत मूकनायक सन्मान**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रानबा गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन स्वागताध्यक्ष तथा फुले–आंबेडकरी अभ्यास समूहाचे इंजि. भगवान साकसामुद्रे यांनी केले, तर नितीन ढाकणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**घरकुल योजनेचा महाभ्रष्टाचार?**

आणी मनमानी कारभारात वागत आहेत कारण त्यांना कधी पंचायत समितीच्या घरकुल विभागाला नागरिकांनी पाहीलेच नाही व तसेच विभागाच्या इंजिनिअर असल्या सारखे सुध्दा वाटत नाही कारण त्या कधी घरकुल विभागाला उपलब्ध नसतात त्यांच्या मनाला वाटेल तीकडे जातात येतात असा मनमानी कारभार घरकुल विभागाच्या आडस सर्कल मध्ये असणाऱ्या इंजिनिअर सुरू आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**राजर्षी शाहू शाळेत समारंभ!**

खाडे व कु. गार्गी क्षीरसागर यांनी आपले शाळेतील अनुभव सांगितले व आठवणींना उजाळा दिला.विद्यार्थ्यांना बोलताना श्री. यादव म्हणाले म्हणाले चांगली व्यक्ती म्हणून जीवन जीवन जगा,आपले ध्येय निश्चित करा.जे क्षेत्र निवडाल त्यात निपुण व्हा.श्रीमती अनिता जाधव यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी प्रयत्नरत राहा असे सांगत भावी आयुष्यासाठी मनभरुन शुभेच्छा दिल्या.प्रमुख पाहुणे श्री. डांगे यांनी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करत त्यांचे कौतुक केले व जीवनातील प्रत्येक संकटाचा सामना धैर्याने करा व आपल्या यशस्वी जीवनातून शाळा पालक व देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करा असे सांगितले.परिसरातील यशस्वी विद्यार्थ्यांची उदाहरणे देत यशाचे गमक विद्यार्थ्यांना सांगितले.

## पान सहा वरून

**आका'ची टोळी अजूनही**

सार्वजनिक झाला तर राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे देशमुखांच्या बाजूने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम या प्रकरणी बोलताना म्हणाले.उज्ज्वल निकम आजच्या सुनावणीची माहिती देताना म्हणाले, न्यायालयाने आरोपींना त्यांचे म्हणणे मांडायला सांगितले आहे. येत्या २४ एप्रिल रोजी या प्रकरणी पुन्हा सुनावणी होईल. आजच्या सुनावणीत आरोपी वाल्मीक कराडची चल–अचल संपत्ती जप्त करण्याची मागणी एका अर्जाद्वारे कोर्टात केली. त्यावर वाल्मीककडून खुलासा दाखल करण्यात आला नाही. त्याचा खुलासा मिळाला की, त्यावर रितसर सुनावणी होईल. वाल्मीक कराडने कोर्टात एक अर्ज दाखल केला आहे. त्यात त्याने माझा हत्याकांडात समावेश नाही व मी खंडणीही मागितली नाही असा दावा केला आहे. या माध्यमातून तो वाचवण्याचा केवीलवाणा प्रयत्न करत आहे.

**मास्टरमाइंड तहव्वूर राणाला**

ज्येष्ठ वकील कृष्णन यांनी कोर्टात युक्तिवाद केला.कोर्टात सुनावणी सुरू असताना सुरक्षा रक्षकांचा कोर्टाबाहेर मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सुरक्षा रक्षकांनी कोर्टाबाहेर रूट मार्च काढला. या परिसरात वाहनांना मज्जाव करण्यात आला होता. कोणत्याही वाहनाला कोर्ट परिसरात प्रवेश दिला जात नव्हता. तसेच कोणत्याही व्यक्तीला आत सोडण्यात येत नव्हते.विमानतळावर अटक करण्यात आल्यानंतर अडीच तासानंतर राणाला कोर्टात आणण्यात आलं. विमानतळावरच त्याची मेडिकल चेकअप करण्यात आली होती. कोर्टातून राणाला थेट एनआयएच्या मुख्यालयात नेण्यात येणार आहे. त्यामुळे एनआयएचं मुख्यालय सॅनिटाईज करण्यात आलं आहे. एनआयएच्या कार्यालयाबाहेर डॉग स्क्वॉडची टीम तैनात करण्यात आली आहे. मुख्यालयाबाहेरच्या प्रत्येक गोष्टीची तपासणी करण्यात येत आहे.तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पण प्रकरणी अमेरिकेच्या न्याय विभागाचे प्रवक्ते निकोल नवास ऑक्समन यांनी मीडियाशी संवाद साधला आहे. प्रत्यार्पण २६/११ च्या पीडितांना न्याय देण्यासाठीचं महत्त्वाचं पाऊल आहे. अमेरिकेने दोषी दहशतवादी तहव्वूर राणाला भारतातील हल्ल्याप्रकरणी प्रत्यार्पित करण्यात आले आहे. त्याच्याशी संबंधित १० गुन्हे भारताने दाखवले होते. दहशतवादी हल्ल्यात सहा अमेरिकन नागरिकांचा मृत्यू झाला होता. राणाचं प्रत्यार्पण म्हणजे त्या अमेरिकन नागरिकांना न्याय देण्यासाठी उचलण्यात आल्याचं हे पाऊल आहे, असं निकोल नवास ऑक्समन म्हणाल्या.

**परळीत विद्यार्थी प्रबोधन**

अनंत इंगळे, माजी नगरसेवक महेंद्र रोडे ,बीड जिल्हा मुफ्टा शिक्षक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे, फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे, आदर्श शिक्षक दिलीप भालेराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विठ्ठलराव झिलमेवाड, कवी बालाजी कांबळे, पत्रकार विकास वाघमारे, नवनाथ दाणे, विद्याधर शिरसाठ, विनायक काळे ,आकाश देवरे, सम्राट गायकवाड आदींनी केले आहे.

**बीडमध्ये कोटींचा निधी**

दिली. या निधीतून निर्माण होणाऱ्या सुविधांमुळे ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीनंतर जिल्ह्यातील रूग्णालयाचा आढावा घेतला होता. शिवाय आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देवून त्याठिकाणी रूग्णालय इमारतीचा प्रश्न लक्षात घेत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात पाठपुरावा सुरू केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून आता जिल्ह्यातील गरज असलेल्या ३३ आरोग्य उपकेंद्रांना इमारती मिळणार आहेत.

**नुकसानीचे पंचनामे**

शेतातील गहू, हरभरा, तूर या धान्याचे तसेच चारा, गाडी बैल, पशू खाद्य, मोटर पाईपलाईन याचे मोठे नुकसान झाले. शेतात असलेली काही जनावरे देखील आगीत होरपळली. आग लागल्याचे कळताच तातडीने अग्निशमन दलाच्या गाड्या आल्या आणि आग आटोक्यात आणण्यात यश आले.

संपादक : बाळासाहेब भगवान मस्के, कार्यकारी संपादक : सुनिल मसू डोंगरे
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# विज्ञान शाखेत प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांसाठी मोफत अभ्यासक्रम



◆ पुणे (प्रतिनिधी) :

शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये अकरावीला विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ४५ दिवसांचा मोफत पायाभूत अभ्यासक्रम राबवण्यासाठी फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालयाने पुढाकार घेतला आहे. हा अभ्यासक्रम १० एप्रिलपासून सुरू करण्यात येणार असून, त्यात स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (पीसीएम), भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (पीसीबी) या गटांतील मूलभूत संकल्पना शिकवल्या जाणार आहेत.

फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय तडके, उपप्राचार्य डॉ. डी. डी. कुंभार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई), राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षा (नीट), एमएचटी-सीईटी अशा परीक्षांची विद्यार्थी तयारी करतात. या विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांचे पायाभूत ज्ञान पक्के करून घेण्यासाठी पायाभूत अभ्यासक्रम राबवला जाणार आहे.

या अभ्यासक्रमात दहावीपर्यंतचे गणित, विज्ञान या विषयांची उजळणी करून घेतली जाणार आहे. तसेच, जेईई, नीट, एमएचटी-सीईटी या परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक अभ्यासक्रमाच्या तयारीसाठी पीसीएम, पीसीबी गटातील मूलभूत संकल्पना तज्ज्ञ, अनुभवी प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. सकाळी नऊ ते दुपारी बारा या वेळेत या अभ्यासक्रमाचा वर्ग होणार असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.

कोणत्याही शाळेतून दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येणार आहे. त्यासाठी https://registration.deccansociety.org/Registration/Apply/FCJR या दुव्याद्वारे नोंदणी करता येईल, असे डॉ. कुंभार यांनी स्पष्ट केले.

# पिंपरीत ४३५ कोटी रुपयांचा मिळकतकर थकीत

कारवाई करूनही एक लाख ३० हजार थकबाकीदार

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :



महापालिकेच्या कर संकलन विभागाने मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी गेल्या आर्थिक वर्षात जप्तीपूर्व नोटिसा देत मालमत्ता लाखबंद (सील) करणे, नळजोड खंडित करण्यासह विविध उपाययोजना केल्यानंतरही शहरातील एक लाख ३० हजार ८०३ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नसल्याची बाब समोर आली आहे. या मालमत्ताधारकांकडे ४३५ कोटी रुपयांची थकबाकी आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख ५० हजार निवासी व बिगरनिवासी मालमत्ता असल्याची नोंद महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाकडे आहे. कर संकलन विभागाला गतवर्षी एक कोटींचे उद्दिष्ट दिले होते. यासाठी कर संकलन विभागाने थकीत व नियमित कर वसुलीसाठी जप्तीपूर्व नोटिसा देत जप्ती, नळजोड तोडण्याची कारवाई केली. दरमहा दोन टक्के दराने विलंब दंड आकारला जात होता. कर भरावा, यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. त्यानंतरही ३१ मार्चअखेर ९६६ कोटी रुपयांपर्यंत कर वसुली केली. एक लाख ३० हजार ८०३ मालमत्ता धारकांनी थकीत व मूळ कर भरला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

थकबाकीमध्ये सर्वाधिक एक लाख नऊ हजार ६०० निवासी मालमत्ता असून त्यांच्याकडे २६६ कोटी ८० लाखांची थकबाकी आहे. चालू आर्थिक वर्षांत या थकबाकीदारांकडे महापालिकेचे विशेष लक्ष असणार असून त्यांचा कर वसूल करण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

गेल्या आर्थिक वर्षात एक हजार ७२ मालमत्ता लाखबंद करण्यात आल्या. त्यापैकी ५१० मालमत्ता धारकांनी कर भरला आहे. ५६२ मालमत्ताधारकांनी अद्याप कराचा भरणा केला नाही. त्यामुळे या मालमत्तांचा लिलाव करण्यात येणार आहे. थकीत कर वसुलीसाठी जप्तीची कारवाई सुरूच ठेवण्यात येणार आहे, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी सांगितले.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची सूचना

# रस्ते, पालखी तळ दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करा



◆ पुणे (प्रतिनिधी) :

'पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासह पालखी मार्गावरील रस्ते, पालखीतळ दुरुस्तीसाठीचे प्रस्ताव दोन दिवसांत सादर करावेत,' अशी सूचना राज्याचे ग्रामविकास आणि पंचायत राज्यमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. रस्तेदुरुस्तीच्या अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून रस्त्याच्या कामांना मान्यता आणि निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

आषाढी वारीपूर्व तयारी संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात सोमवारी बैठक झाली. त्या वेळी गोरे यांनी ही सूचना केली. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन देसाई, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अपर आयुक्त अरुण आनंदकर यांच्यासह अन्य अधिकारी या वेळी उपस्थित होते.

'पालखी मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग आणि विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल, याची विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही होईल याकडे लक्ष द्यावे. वारीदरम्यान देण्यात आलेल्या कामांसाठी कंत्राटदारांकडून अटी आणि शर्तीचे पालन करून कामे होण्यासाठी त्यांच्यावर शासकीय यंत्रणेने अंकुश ठेवावा. ग्रामपंचायतींना आगाऊ निधी देण्याची व्यवस्था करण्यात येईल,' असे गोरे यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. गोरे यांनी आषाढीवारीच्या अनुषंगाने सर्वच जिल्ह्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. पुणे, सातारा, सोलापूर, नाशिक आणि जळगाव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी सोहळ्याच्या आनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.

# मावळसाठी लोकसभा अधिवेशन फलदायी

◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

मावळ लोकसभा मतदारसंघातील मुठा, मुळा, इंद्रायणी, पवना आणि उल्हास या नद्यांचे सुधार प्रकल्प, लोकलसह रेल्वेचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशन फलदायी ठरले आहे. यासह बांगलादेश, पाकिस्तान, म्यानमार आणि नेपाळमधून मोठ्या प्रमाणात अवैध घुसखोरी होत आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात येते. त्यासंदर्भातही अधिवेशनात आवाज उठविल्याची माहिती मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. केंद्र सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच संपले. या अधिवेशनात खासदार बारणे यांनी मतदारसंघासह देशाच्या सुरक्षिततेसंदर्भात विविध प्रश्नांवर आवाज उठविला. याबाबतची माहिती खासदार बारणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.



पवना व इंद्रायणी नदी सुधार योजनांना त्वरित मंजुरी द्यावी. इंद्रायणी नदीचा उगम मावळमधून होतो. नदी देहू-आळंदी तीर्थक्षेत्रातून वाहते. वारकरी संप्रदायातील भाविक याच पवित्र नदीत स्नान करतात. त्यामुळे पवना व इंद्रायणी नदी सुधार योजनांना त्वरित मंजुरी मिळावी, अशी मागणी केली. त्याला सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नद्यांचे वाढते प्रदूषण रोखण्यासाठी राज्य सरकारच्या अखत्यारित येणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषद आणि जिल्हा परिषदेला नदी स्वच्छतेचा कार्यक्रम सोपवावा, अशीही तरतूद केली.

आकुर्डी, चिंचवड, तळेगाव, लोणावळा व पनवेल जंक्शन ही महत्त्वाची रेल्वे स्थानके 'अमृत भारत स्टेशन' योजनेत समाविष्ट करून त्यांचा दर्जा वाढवावा. कोरोना काळानंतर बंद झालेली दुपारी १.३० ची पुणे-लोणावळा लोकल सेवा पुन्हा सुरू करावी. जेणेकरून विद्यार्थी, महिला व कामगार वर्गाला याचा लाभ होईल.

तिसऱ्या व चौथ्या लेनचे काम तात्काळ सुरू करावे. पनवेल-कर्जत नवीन रेल्वे मार्ग जलद गतीने पूर्ण व्हावा. पनवेल ते लोणावळा दरम्यान तिसरा-चौथा मार्ग तयार करून नवीन विमानतळाशी चांगली जोडणी व्हावी. याबाबत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे हे प्रश्न लवकरच मार्गी लागतील, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

## वेचक

### कौटुंबिक वादातून घर पेटवून देण्याचा प्रयत्न

**पुणे :** कौटुंबिक वादातून घराच्या दरवाज्यावर पेट्रोल ओतून पेटवून देण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली. नगर रस्त्यावरील केसनंद गावात ही घटना घडली. नवनाथ नंदकुमार हरगुडे असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत प्रशांत हरगुडे यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नवनाथ आणि फिर्यादी प्रशांत चुलतभाऊ आहेत. शनिवारी कौटुंबिक वादातून नवनाथने पत्नीला मारहाण केली होती. दोघांमधील वाद सोडविताना नवनाथ आणि प्रशांत यांच्यात झटापट झाली. प्रशांतने नवनाथला मारहाण केली होती. नवनाथ प्रशांतवर चिडला होता. रविवारी मध्यरात्री प्रशांत आणि कुटुंबीय गाढ झोपेत होते. त्यावेळी नवनाथने बाटलीत पेट्रोल आणून दरवाज्यावर ओतले. प्रशांत याच्या घराचा दरवाजा पेटवून दिला. दरवाजाने पेट घेतल्यानंतर गाढ झोपेत असलेले प्रशांत आणि कुटुंबीय जागे झाले. दरवाज्यावर पाणी ओतून आग आटोक्यात आणल्याने दुर्घटना टळली. त्यानंतर प्रशांतने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी नवनाथला अटक केली असून, पोलीस उपनिरीक्षक मनोज बागल तपास करत आहेत.

### शिडीवरून पडल्याने विद्यार्थी जखमी

**पिंपरी :** थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत पडदा काढण्यासाठी शिडीवर चढलेला १२ वर्षीय विद्यार्थी पाय घसरून खाली पडल्याने गंभीर जखमी झाला आहे. याबाबत मनोज भीमराव म्हस्के यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार महिला शिक्षिका आणि सफाई कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हस्के यांच्या शिव शक्ती फाऊंडेशन संचालित स्पंदन बाल आश्रमात राहणारा १२ वर्षीय मुलगा थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळेत शिकत आहे. त्याला शिक्षिका आणि सफाई कर्मचारी यांनी शाळेतील पडदा काढण्यासाठी शिडीवर चढवले. शिडीवरून पाय घसरून मुलगा खाली पडला. त्याच्या दोन्ही हाताला मार लागला आहे. त्यात तो गंभीर जखमी झाला आहे. काळेवाडी पोलीस तपास करीत आहेत.

### आग प्रात्यक्षिकात तरुण भाजला

**पिंपरी :** रामनवमीनिमित्त तळेगाव दाभाडे येथे काढलेल्या मिरवणुकीत आगीसंबंधी प्रात्यक्षिक दाखवत असताना एक तरुणाला भाजल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलीस अंमलदार कृष्णा कातकडे यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राम नवमीनिमित्त तळेगाव दाभाडे येथे मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये तलवारबाजी आणि आगीसंबंधी प्रात्यक्षिक करण्यास पोलिसांनी बंदी घातली होती. तरी देखील आगीबाबत प्रात्यक्षिक करण्यात आले. हे प्रात्यक्षिक करत असताना एकाच्या चेहऱ्याला भाजले. यामध्ये तो जखमी झाला. या प्रकरणी आयोजक आणि प्रात्यक्षिक सादर करणारा अशा दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळेगाव दाभाडे पोलीस तपास करीत आहेत.

### ऑनलाइन सट्टेबाजी प्रकरणात चौघांना अटक

**पुणे :** अश्वशर्यतीवर ऑनलाइन सट्टा घेणाऱ्या चौघांना वानवडी पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून सट्टेबाजीसाटी वापरलेले मोबाइल संच, तसेच 'रेसिंग बुक' असा ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मेहमूद शेख, फैज शेख, चाँद शेख, अकबर अन्वर खान अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईतील रेसकोर्सवर सुरू असलेल्या अश्वशर्यतींवर मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन सट्टेबाजी सुरू असल्याची माहिती पोलीस कर्मचारी कांबळे यांना मिळाली. त्यानंतर पोलीस पथकाने फातिमानगर भागातील एका सदनिकेत छापा टाकला. तेव्हा सदनिकेत फैज, चाँद, अकबर हे मोबाइलवर ऑनलाइन सट्टा घेत असल्याचे उघडकीस आले

# पिंपळे-निलख येथील नागरिकांचा निघणार हंडा मोर्चा...

◆ पिंपरी (प्रतिनिधी ) :

मागील दोन महिन्यापासून पिंपळे निलख, विशाल नगर, वाकड भागात कमी दाबाने व अवेळी पाणीपुरवठा होत आहे. या परिसरात जवळपास ४० हजार लोकवस्ती, हजारो दुकाने व व्यवसायिक आस्थापना आहेत. मोठ्या प्रमाणात सोसायटी परिसर आहे. मागील सहा वर्षांपूर्वी तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिवसाआड पाणीपुरवठा देण्याचे धोरण शहरभर सुरू केले होते. तेव्हापासून या परिसरात अनेकदा पाणीपुरवठा कमी दाबाने व अवेळी करण्यात येतो. या परिसरातील नागरिक नियमितपणे महानगरपालिकेचा मिळकत कर व पाणीपट्टी कर भरतात. येथील पाणीपुरवठ्याबाबत अधिकारी व कर्मचारी उदासीन आहेत. मागील दोन महिन्यांपासून या परिसरातील सोसायटी धारकांनी लाखो रुपये खर्च करून टँकरने पाणी घेतले आहे. या प्रदूषित पाण्यामुळे येथे रोगराई वाढण्याची शक्यता आहे पुढील चार दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा "ड"प्रभाग क्षेत्रिय कार्यालयावर शुक्रवारी (दि. ११) शेकडो महिला भगिनींचा हंडा मोर्चा काढून प्रभागातील अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल असा इशारा भाजपाचे ज्येष्ठ नेते सचिन साठे यांनी दिला आहे.

# उच्च क्षमतेचे ध्वनिवर्धक वापरणाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**पुणे :** श्रीराम नवमी उत्सवात उच्च क्षमतेचे ध्वनीवर्धक वापरून ध्वनीप्रदूषण केल्याप्रकरणी पोलिसांकडून अखिल भारती विद्यापीठ उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांकडून चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत पोलीस शिपाई राघुजी रुपनर यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ध्वनीवर्धक वापराबाबत दिलेले सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश धुडाकाविणे, तसेच पर्यावरण ध्वनी प्रदूषण अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महापालिका आयटीआय विद्यार्थ्यांना आता विद्यावेतन

◆ पिंपरी ( प्रतिनिधी) :

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचालित आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्था ) मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय आयटीआयमधील विद्यार्थ्यांप्रमाणे विद्यावेतन लागू करण्याच्या प्रस्तावाला महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली आहे.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दरमहा ५०० रुपये इतके विद्यावेतन देण्यात यावे, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याआनुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने कार्यवाही केली आहे. दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या धर्तीवर मनपा आयटीआयच्या विद्यार्थ्यांनाही ५०० रुपये इतके विद्यावेतन द्यावे, असा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठवला होता. मात्र, सदर प्रशिक्षण केवळ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाच योजना लागू करता येईल. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे कळवले होते. त्यानुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत आयुक्तांनी मान्यता दिली. दरवर्षी सुमारे ९०० प्रशिक्षणार्थ्यांचे ५०० रुपये प्रमाणे ४ लाख ५० हजार रुपये प्रतिमहिना खर्च महानगरपालिका स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या पुढील काळात आयटीआयमध्ये ट्रेड वाढल्यास त्या विद्यार्थ्यांनाही विद्यावेतन देय राहील, असे धोरण ठरवण्यात आले आहे.

# शहरातील ८५० रुग्णालयांना आरोग्य विभागाकडून नोटीस

◆ पुणे(प्रतिनिधी) :

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील ८५० रुग्णालयांना नोटीस पाठविण्यात आली आहे. इमर्जन्सी केसमध्ये संबधित रुग्णांच्या कुटुंबीयांकडून डिपॉझिट घेऊ नये, उपचार दिल्यानंतर इतर गोष्टींबाबत कुटुंबीयासोबत चर्चा करा, रुग्णालयात आलेल्या रुग्णांना प्राधान्याने उपचार दिले पाहिजे. जर कोणत्याही रुग्णालयाने डिपॉझिटची मागणी केल्यास त्या रुग्णालयावर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पुणे महानगरपालिकेचे आरोग्य विभागाचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ.सूर्यकांत देवकर यांनी माहिती दिली.

दरम्यान, भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहायक सुशांत भिसे यांच्या पत्नी तनिषा भिसे यांचं प्रसुतीदरम्यान निधन झालं. पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने १० लाख रुपये डिपॉझिट भरण्यास सांगितले. त्यावेळी भिसे कुटुंबीयांकडे एवढी रक्कम भरण्यास नव्हती. त्यामुळे तनिषा भिसे यांना दुसऱ्या रुग्णालयात जावं लागलं, पण प्रसूतीनंतर तनिषा भिसे यांचं काही वेळात निधन झाल्याची घटना घडली. याच पार्श्वभूमीवर रुग्णालयांना आरोग्य विभागाकडून नोटीस देण्यात आल्या आहेत.

# सार्वजनिक-खासगी भागीदारी या पद्धतीने निधी दिला जाणार

◆ पुणे (प्रतिनिधी) :



शहर स्मार्ट करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने दहा वर्षांपूर्वी सुरू केलेला प्रकल्प बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असला, तरी स्मार्ट सिटी प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेली 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' ही विशेष उद्देश कंपनी सुरूच राहणार आहे. 'या कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी कायम राहणार असून, त्यांची जबाबदारी महापालिका घेणार आहे,' अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी दिली. स्मार्ट सिटी प्रकल्पांसाठी दिला जाणारा निधी केंद्र सरकारने ३१ मार्च २०२५ पासून देण्यास बंद केला आहे.

या प्रकल्पांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या योजना तसेच नागरी सुविधा महापालिकेकडे हस्तांतरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, गेल्या काही महिन्यांपासून हे प्रकल्प हस्तांतरित केले जात आहेत. स्मार्ट सिटी प्रकल्पांसाठी स्थापन करण्यात आलेली कंपनी आणि तेथे काम करणारे कर्मचारी यांच्याबाबतचा निर्णय प्रलंबित होता. या संदर्भात सोमवारी केंद्र सरकारकडून दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठक घेण्यात आली. या बैठकीत राज्य सरकारने स्मार्ट सिटी कंपनी सुरूच ठेवण्याची भूमिका घेतल्याचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. ते म्हणाले, 'देशातील ज्या शहरांमध्ये स्मार्ट सिटी योजना राबविण्यात आली, त्या राज्यांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित होते. स्मार्ट सिटी योजनेत राबिण्यात आलेले प्रकल्प कोणतेही राज्य बंद करणार नाही. त्याच्या व्यवस्थापनामध्ये केवळ बदल केला जाणार आहे. पुणे स्मार्ट सिटीची कंपनीदेखील बंद न करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुणे स्मार्ट सिटीसाठी सुरुवातीला १ हजार कोटींच्या प्रकल्पांची आखणी करण्यात आली होती.

प्रत्यक्षात पुणे महापालिका, पीएमपी तसेच इतर विभागांकडील अतिरिक्त निधी घेऊन सुमारे १८२३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. यामधून सुमारे ५२ प्रकल्प पूर्ण करण्यात आले. यासाठी केंद्र सरकारने ४९० कोटी, तर पुणे महापालिका आणि राज्य सरकारने प्रत्येकी २४५ कोटी रुपये दिले. मोठ्या शहरांच्या विकासासाठी 'अर्बन चॅलेंज फंड' स्थापन केला जाणार असून, त्यासाठी केंद्राकडून अनुदान आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी या पद्धतीने निधी दिला जाणार आहे. या प्रकल्पांची देखील अंमलबजावणी 'एसपीव्ही' करू शकते. त्यामुळे राज्य सरकारने ही कंपनी आणि त्यातील कर्मचारी कायम ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

### 'अर्बन डिजिटल मिशन' सुरू करण्यात येणार

स्मार्ट सिटीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या प्रकल्पांची देखभाल करण्याची जबाबदारी आता महापालिकेवर आहे. महापालिका त्याचे नियोजन करणार असून, महापालिकाच त्यासाठीचा खर्च करील,' असेही त्यांनी स्पष्ट केले. इतर प्रकल्पांसाठीही 'एसपीव्ही' उपयुक्तकेंद्र सरकारकडून पुढील काही महिन्यांमध्ये 'अर्बन डिजिटल मिशन' सुरू करण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पांसाठीची विशेष उद्देश कंपनी (एसपीव्ही) उपयुक्त ठरू शकते, असे मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले.



श्री रामजी संस्थान तुळशीबागच्या वतीने तुळशीबाग येथील श्रीराम मंदिरात ललीत पायघडी कीर्तन व श्रीराम राज्याभिषेकाच्या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले . यावेळी पायघड्यांचे दर्शन घेताना भाविक व तुळशीबाग परिवार .

गायक, संगीतकार मंदार आपटे यांचा विशेष सत्कार

# अरुण दातेंमुळे तीन पिढ्या भावगीतांच्या विश्वात रमल्या : मेधा कुलकर्णी

◆ पुणे (प्रतिनिधी) :




१९६३ साली शुक्रतारा हे गाणे लिहिले गेले असेल, त्या काळी आमचा जन्मही झाला नव्हता, त्या काळची तरुण पिढी अरुण दातेंची भावगीते ऐकायची, त्यामध्ये रमायची. आम्ही तरुण वयात असताना त्या भावविश्वात आम्हीही रंगलो आता आमची मुले तारुण्यात येत असताना अरुण दाते यांच्या गीतांमधील गोडवा आजही कायम आहे. त्यामुळे अरुण दातेंमुळे तीन पिढ्या या भावगीतांच्या विश्वात रमल्या, अशा भावना खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. 'शुक्रतारा', 'लाजून ते हसणे...', 'झोपाळ्या वाचून झुलायचे...', 'या जन्मावर...' अशी कित्येक गाणी आजही रसिकांच्या मनावर गारुड घालत अरुण दाते यांच्या आठवणी जाग्या करतात, असेही त्यांनी नमूद केले. स्व. अरुण दाते यांच्या सुमधुर गीतांच्या 'नवा शुक्रतारा' च्या १०० व्या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुण्या म्हणून मेधा कुलकर्णी उपस्थित होत्या, त्यावेळी त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

माणिक निर्मित, अतुल अरुण दाते प्रस्तुत आणि मॅजिस्टिक्स लँडमार्क्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला 'नवा शुक्रतारा' हा कार्यक्रम आज कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झाला. अतुल अरुण दाते, मॅजिस्टिक्स लँडमार्क्सच्या प्रीती पानसे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. १०० व्या 'नवा शुक्रतारा' निमित्त आज गायक, संगीतकार मंदार आपटे यांचा विशेष सत्कार देखील करण्यात आला.

यावेळी बोलताना मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "शुक्रतारा हा कार्यक्रम लोकप्रिय ठरतो कारण त्यातील गाणी पुन्हा पुन्हा ऐकण्याची मागणी ही रसिकांची आहे. अरुण दाते मला मुलगी मानायचे. त्यांच्या आवाजात जेवढा गोडवा होता तेवढाच गोडवा त्यांच्या स्वभावातही होता. त्यांचे वागणे देखील खूप छान असायचे. आज नवा शुक्रताराचे प्रयोग पाहताना अरुण दाते यांच्या आवाजाची, गाण्याच्या गोडव्याची प्रचीती येते, असेही कुलकर्णी यांनी नमूद केले.

'नवा शुक्रतारा'च्या १०० व्या कार्यक्रमानिमित्त सहभागी कलाकारांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. यामध्ये गायिका पल्लवी पारगांवकर, वर्षा जोशी यांसोबतच प्रसन्ना बाम, अमित कुंटे, अभय इंगळे, प्रणव हरिदास, झंकार कानडे, अमेय ठाकुरदेसाई, प्रशांत कांबळे, सायली सोनटक्के, शुभंकर कुलकर्णी, तुषार जोशी यांचा समावेश होता.

# अण्णा बनसोडे यांचा आज नागरी सत्कार



◆ पिंपरी (प्रतिनिधी) :

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. बुधवारी, ९ एप्रिल रोजी हॉटेल रागा पॅलेस, मदर तेरेसा उड्डाणपूल, काळेवाडी, पिंपरी, पुणे १८ येथे सायंकाळी पाच वाजता या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष योगेश बहल यांनी मंगळवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी योगेश बहल यांनी सांगितले की, माजी मंत्री स्वर्गीय प्रा. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर पिंपरी चिंचवड शहराला मंत्रीपदाचा दर्जा असणारे पद उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली मिळाले आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या दृष्टीने हा एकनिष्ठ कार्यकर्त्याला मिळालेला सन्मान आहे. अण्णा बनसोडे यांनी यापूर्वी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नगरसेवक आणि स्थायी समिती सभापती पदावर काम केले आहे. तसेच ते पिंपरी विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा आमदार म्हणून २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून आले आहेत. अण्णा बनसोडे हे पक्षाच्या प्रती एकनिष्ठ आहेत. शहरातील सर्वसामान्य गोरगरीब, उपेक्षित समाजात त्यांचा दांडगा संपर्क आहे, असेही बहल यांनी सांगितले.

# नोकरी कोणाची आणि घर कोणाचं...



क्राइम
अॅड. रिया करंजकर



एक काळ असा होता की, लोकांना घरातून ओढून घेऊन नोकरीला लावलं जात होतं. नोकऱ्या मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या; परंतु त्यासाठी कामगार मुंबई शहरांमध्ये उपलब्ध नव्हता. एकाच वेळी चार-चार ठिकाणांवरून नोकरीसाठी बोलवण्यात येत होतं. असा तो काळ होता. मुंबई महापालिकेमध्ये अनेक कामगारांची भरणा त्यावेळी करण्यात आली होती आणि कामगार राहणार कुठे म्हणून त्यांच्यासाठी वसाहती निर्माण करण्यात आले की, जेणेकरून महापालिकेमध्ये कामगार काम करेल. अशा वसाहतींमधल्या घरांमध्ये एकाच कुटुंबामध्ये अनेकजण राहत होती. महापालिकेत काम करणारा एक होता पण त्याचं अख्ख कुटुंब त्या घरामध्ये राहत होतं. वडिलांच्या नंतर मुलाला महापालिकेची नोकरी मिळत होती. हे अनेक वर्षे असंच चालू होतं. त्याच्यामुळे ती खोली कायमची त्याच कामगारांकडे असायची.

वसंत हा एक महानगरपालिकेमध्ये काम करणारा कामगार होता. त्यालाही त्याच्या वडिलांकडून ही नोकरी मिळाली होती. त्यामुळे ज्या वसाहतीमध्ये तो राहत होता ती खोली आता त्याच्या नावे झाली होती. वसंत यांनी दोन लग्न केली होती. एक बायको ही वेगळ्या ठिकाणी राहत होती आणि दुसरी बायको ही या महापालिकेच्या वसाहतीमध्ये राहत होती. पहिल्या बायकोकडे वसंत येऊन जाऊन असायचा. वसाहतीच्या खोलीमध्ये त्याची दुसरी बायको आणि भाऊ सुदर्शन, त्याचे कुटुंब राहत होते. वसंतचा भाऊ म्हणायचा की, वडिलांची नोकरी तुला मिळाली तर ही खोली माझी आहे. असे त्या भावांमध्ये वाद सुरू झाले. वसंतही त्या गोष्टींकडे कानाडोळा करत होता. जसं वय वाढत गेलं तसं वसंतचे आजारपण वाढत गेले आणि एक दिवस अटॅक येऊन वसंतचा मृत्यू झाला. वसंत निघून गेल्यावर कायदेशीर प्रक्रिया करताना पहिली पत्नी सुधा ही त्याची कायदेशीर पत्नी होती, तर दुसरी बायको वासंती ही कायदेशीर पत्नी नव्हती. वसंतने आपल्या कामातील कागदपत्रांवर सुधाचे नाव लिहिले होते. सुधाला दोन मुलं होती. वासंतीला काहीच मूलबाळ नव्हतं. ती सुदर्शनसोबत राहत होती. वसंतचे पीएफ व ग्रॅज्युएटी मिळण्याची वेळ आली तेव्हा. सुधाने वासंतीला सांगितलं की मी तुझ्यावर अन्याय करणार नाही तुलाही त्याच्यातला थोडा भाग देईन. ज्यावेळी सुधा महापालिकेच्या ऑफिसमध्ये गेली. त्यावेळी तिला तिथून सांगण्यात आले की जोपर्यंत तुम्ही महापालिकेचे वसाहतीमधले घर पालिकेच्या ताब्यात देत नाही तोपर्यंत तुम्हाला वसंतची ग्रॅज्युएटी मिळणार नाही एवढेच नाही, तर तुम्हाला पेन्शनही सुरू होणार नाही. म्हणून तिने आपल्या दिराला सुदर्शनला ती रूम खाली करण्यास सांगितले. वसंतच्या नावावर ती रूम असल्यामुळे सुदर्शन ती रूम खाली करायला तयार नव्हता. वसंतला वडिलांची नोकरी मिळाली मला ही खोली पाहिजे असे तो महापालिकेला म्हणत होता. पण जोपर्यंत नोकरी असते तोपर्यंत खोली असते हे त्याला समजत नव्हतं. सुधाने अनेक फेऱ्या महापालिकेत घातल्या. तिला तेच उत्तर मिळत होतं. शेवटी महापालिकेच्या अधिकाऱ्याने तिला सांगितलं की, जोपर्यंत सुदर्शन खोली खाली करत नाही तोपर्यंत तुमची ग्रॅज्युएटीमधून आम्ही त्या घराचं भाडं वजा करत जाणार आहोत. ही गोष्ट सुधाने सुदर्शनला सांगितली. तरीही तो ऐकायला तयार नव्हता. महापालिकेने खोली खाली करण्याची जबाबदारी सुधाच्या नावावर टाकली होती. सुधा आणि दोन मुलांचं कसं होणार हा प्रश्न तिच्या समोर होता. शेवटी अनेक प्रयत्न करून महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी तिला पेन्शन सुरू करून देतो असे सांगितले पण वसंतची थकीत रक्कम ही आम्ही रूम खाली करत नाही तोपर्यंत देणार नाही असे सांगितले. महानगरपालिकेने सुधाला कायदेशीररीत्या कोर्टात जाऊन तुम्ही ती खोली खाली करून द्या असे सांगितले. उद्या थकबाकीतले पैसे भाडे म्हणून संपले, तर ती खोली तुमच्या नवऱ्याच्या नावावर हे म्हणून महापालिका तुमच्यावर कायदेशीर कारवाई करेल असे सुधाला सांगितले. पण हे सुदर्शनला कळत नव्हतं की ज्याच्या नावावर ती खोली आहे तो मरण पावलेला आहे. त्याच्यामुळे पुढील भविष्यामध्ये मृत पावलेल्या नावाने खोली मिळणं शक्य नव्हतं जरी सुदर्शन वसंताच्या दुसऱ्या बायकोचा सांभाळ करत असला तरी ही खोली त्याला मिळणार नव्हती कारण वसंतनंतर त्याच्या पुढची पिढी महापालिकेमध्ये कामावर घेतली नव्हती. कायद्यात बदल झाल्यामुळे वारस त्याच्या जागेवर कामाला लागणं बंद करण्यात आलं होतं. वसंताने आयुष्यभर काम केले. आपल्या खोलीत भावाला आधार दिला पण काम केलेल्या रकमेतून त्याची पत्नी आणि मुलांना एकही रुपया मिळणार नव्हता. कारण त्याचा भाऊ ती खोली सोडायला तयार नव्हता. त्यामुळे आपल्या पतीच्या मृत्यूनंतर आजपर्यंत राहिलेली थकबाकी ही सुधाला मिळाली नाही म्हणून सुधाने न्यायालयात जाऊन दाद मागण्याचा विचार केला. उद्या नको त्या अडचणीत पडण्यापेक्षा आता कायदेशीर कारवाई केली, तर योग्य ठरेल. या वकिलांच्या सल्ल्याने ती आता न्यायालयीन लढा लढत आहे.

(सत्यघटनेवर आधारित)

# लोकसंस्कृतीचे विद्यापीठ...



अशोक हांडे



स्नेहधारा
पूनम राणे

ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये कार्यक्रम संपल्यानंतर एक भगिनी आपले डोळे पुसत हातावर पाचशे रुपयांची नोट ठेवत म्हणाली, ''या कार्यक्रमाचे तीनशे रुपये तिकीट काढताना मी आपल्याला मनातल्या मनात फारच उलट सुलट बोलले." मला आता त्याच खूपच वाईट वाटतंय, पाचशे रुपये सुद्धा खूप कमी पडले असते, इतका छान कार्यक्रम करून मराठी संस्कृती घराघरांत रुजवण्याचा आपण प्रयत्न करत आहात. जी मुले कार्यक्रमांमध्ये सहभागी आहेत त्यांना खाऊ द्या. एका सामान्य भगिनीकडून मिळालेली ही पोहोचपावती होती, सुप्रसिद्ध दिग्दर्शक, पटकथाकार, निवेदक नेपथ्यकार, अभिनेता, निर्माता, आंब्याचे व्यापारी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, संगीतमय कार्यक्रमाचे निर्माते, लोककला आणि संस्कृती यांचा सुरेख संगम म्हणजे अशोक हांडे.

त्यांचे बालपण उंब्रज या गावी गेले. त्यांचे घराणे वारकरी सांप्रदायाचे होते. त्यामुळे भजन, भारुड, ओव्या यासारख्या लोककलांचा संस्कार त्यांच्या मनावर झाला.

लहानपणी त्यांची आई दळण दळताना जात्यावरील ओव्या म्हणत असे. यावेळेस आईच्या मांडीवर झोपून ते ओव्या ऐकत. त्यांच्या वडिलांनी आंब्याचा व्यवसाय सुरू केला. मुंबईला लालबाग येथील रंगारी बदक चाळ येथे राहायला आले. पहाटेच्या आगमनाची वार्ता देणारा वासुदेव, खंडोबाचा जागर यासारखे वातावरण कलाकारांना मोठे व्यासपीठ देणारे होते. आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम त्यांच्यावर झाला. घरातूनच विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेता यायचा. दहीहंडी, नवरात्रोत्सव, गणेशोत्सव यावेळी अभिनय स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा यांसारख्या स्पर्धा होत असत. त्यामुळे कला दाखवण्याची संधी प्राप्त होत होती. मिश्र वस्तीची माणसं राहत असल्यामुळे, वेगवेगळ्या पद्धतीचे संवाद कानावर पडत होते. त्यामुळे चाळीतूनच त्यांचे बालपण घडले. याच ठिकाणी आचार्य अत्रे, बाबासाहेब पुरंदरे, प्राध्यापक शिवाजीराव भोसले यांची व्याख्याने त्यांनी ऐकली होती. चाळीमध्ये बेंडखळ्यांकडे एकच रेडिओ होता. संध्याकाळी साडेनऊच्या नंतर चाळीतील सर्वच माणसे रेडिओवरील गाणी ऐकण्यासाठी आतुर झालेली असत. त्यावेळी हा बालक गाणी ऐकताना मन लावून प्रत्येक गाण्याचा अर्थ लक्षात घेत असे. बाल वयातच नाटक, नृत्य करून इतरांचे मनोरंजन करीत असे. शाळा कॉलेजमध्ये पिकनिकच्या ठिकाणी इतरांचं मनोरंजन करणे हा त्यांचा प्रमुख छंद. त्यामुळे पिकनिक स्टार म्हणूनही त्यांचा नावलौकिक होता. हापूस आंब्याच्या रसाळ गोडीसमान वाणी असणारे अशोक हांडे सर हे लंडन वारी करण्यासाठी निघाले, ते म्हणतात, ''लंडन वारी करताना जे विमान लंडनला जायला निघालं, ते विमान यशाच ठरलं... लंडनमध्ये त्यांनी एक कागद घेतला आणि कागदावर जाहिरात लिहिली.

" तू दूर दूर तेथे, हुरहुर मात्र येथे
रसिका, आम्ही आज जरी लंडनला असलो, तरी तुझी आठवण येते.''

अशा प्रकारच्या अनेक जाहिराती त्यांनी मंगल गाणी दंगल गाणी या कार्यक्रमासाठी लिहिल्या.

मराठी संस्कृतीचा गौरव, मराठी संस्कृतीचा बाणा आणि रसिकांचा सन्मान, हेच त्यांचे प्रमुख उद्दिष्ट होते. सगळ्या कार्यक्रमांचं नेपथ्य म्हणजे श्रीमंतीच कारण पडदा बाजूला जाताक्षणीच टाळ्यांचा पाऊस रसिक श्रोत्यांकडून हमखास पडते आणि हेच त्यांच्या कार्यक्रमांचे खास आकर्षण आहे. मंगलगाणी दंगलगाणीच्या ७२५व्या प्रयोगासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बाबूजी अर्थात सुधीर फडके उपस्थित होते. ते आपल्या भाषणात म्हणाले " हे एवढे प्रयोग करणे सोपे काम नाही. मी गीत रामायणाचे कार्यक्रम केले. जर आपण असाच कार्यक्रम हिंदीतून केलात तर, आपले नावलौकिक होईल. हा कार्यक्रम भारतभर गाजेल.

मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता घराघरांत रुजवण्याचा प्रयत्न करणारे अशोक हांडे सर म्हणजे जणू काही लोक-संस्कृतीचे महान विद्यापीठच आहेत.

# पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...



मनस्विनी
पूर्णिमा शिंदे

या सृष्टीमध्ये देवाने प्रत्येकाला आपापले आयुष्य दिले. जीव जन्माला घातला. पण त्या नियती किंवा निसर्गाकडून काहींना थोडंफार कमी जास्तही केलं. उदा. माता-पिता दोन्ही सुदृढ, सामान्य, प्रतिभावान, बुद्धिमान असले तरीही त्यांच्या उदरी एखादं मूल मतिमंद, दिव्यांग जन्माला येते. त्याची मानसिक, शारीरिक, कौटुंबिक कारणे आहेत. अशा मुलांवर उद्‌भवलेल्या समस्यांचे निराकरण केले पाहिजे. त्यांनाही चारचौघात मिसळणे शक्य नसते. पण माणूस हा सामाजिक प्राणी असल्याने एकमेकांत जाणं, खेळणं, वागणं, बागडणं आवडतं; परंतु त्यांना काही गोष्टी बौद्धिक, शारीरिक क्षमता व कुवत नसल्याने विविध गोष्टी घडतात, यालाच बुद्ध्यांक किंवा ऐक्यू म्हणतात. यावरूनच त्यांचे मंदत्व किती अंशी आहे हे सिद्ध होते. ही टक्केवारी निदर्शनास येते त्यासाठी समुपदेशन आणि वैद्यकीय तपासण्या, उपचार यातून काही प्रमाणात यश मिळते पण समाजात अशा मुलांच्या आई-वडिलांना मात्र यातून खूप सोसावे लागते, समस्यांना सामोरे जावे लागते. मोठ्या प्रमाणावर जबाबदारी वाढते ते चिंताग्रस्त होतात. पण शेवटी आपल्या हातात जे आहे तितके तरी करूयात. धीर देणे, आधार, पाठबळ देणं, भावनिक साथ देणं, कौतुक, प्रोत्साहन प्रसंगी देणं ही गोष्ट तितकीच महत्त्वाची नाही का!

माणसाचं जीवन हल्ली धक्कादुखीचे झाले आहे. काहीतरी विरंगुळा म्हणून जेवणानंतर सगळेच फेरफटका मारायला बागेत जमले होते. उत्साह, छंद सगळ्यांचाच असतो.

संध्याकाळी अशीच बागेत फेरफटका मारण्यासाठी गेले होते. तिथे एक मुलगा खूप ओरडत होता. त्याचे ७० वर्षांचे वडील ४० वर्षांच्या मुलाचा हात पकडून बागेत फिरवत होते. कोणालाही पाहिलं की गाणं म्हणत ओरडत चालला होता. कारण त्याला इतकसं काही कळत नव्हतं. त्यात वडिलांचे किराणामालाचे दुकान होते. दुकान बंद करून ते जास्तीत जास्त लवकर येण्याचा प्रयत्न करून त्याला फेरफटका मारण्यासाठी घेऊन जात. तो दिवसभर मुलगा घरामध्ये काय करणार? अशा वेळी माझ्या मनात एकच प्रश्न पडला की, "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा"

अशीच एक गोष्ट आहे माझ्या एका अत्यंत जवळच्या मैत्रिणीची मुलगी सुद्धा २१ वर्षांची झाली. जाणतं वय आलं. पण तिला कुठे आश्रमात सोडू शकत नाही. एकटीला सोडू शकत नाही. बरं तिचे वडील आजारी. अशावेळी त्या मुलीचं काय करायचं, घरी वडीलधारी मंडळी नाहीत, लहान बहीण आहे ती शाळेत जाते. मग या मुलीवर लक्ष कसे ठेवणार? तिचं तिला कधी कधी भान सुटतं. भांडी फोडते, ओरडते स्पेशल चाइल्ड शाळेत घातले. महिना महिनाभर शाळेत जायचं नाही. बाईंनी काही बोललं की रुसायचं. खूप शहाण्यासारखं तर कधी वेड्यासारखं वागायचं. या मुलांचं पाहिलं तर बुद्ध्यांक थोडा कमी असतो. त्यांना समजून फक्त आईच घेऊ शकते. पण आई मात्र २४ तास बरोबर राहू शकत नाही. तिलाही तिची कामे, उदरनिर्वाह, चणचण, आरोग्य, घरच्या जबाबदाऱ्या आणि इतर सर्वत्र पाहण्याची गरज असते.



अशा मुलांसाठी योग्य वेळी मार्गदर्शन करण्याची गरज असते. उदा घ्यायचं झालं तर अशा मुलांना सांभाळताना पालकांना मात्र मोठी शिक्षा होते. आपण रेल्वे स्टेशनवर किंवा रस्त्यावर जेव्हा ही मुलं चालत असताना त्यांचे लक्ष कुठे असतं मग पालक त्यांना खेचतात. अगदी रस्त्यावरून चालताना सुद्धा रस्ता भरधाव गाडीपासून संरक्षण करायचं असतं. पण त्यांना काही सुधरत नाही. अशावेळी पालकांच्या मनात विचार येतो की, जन्माला घालून केवढी मोठी शिक्षा झाली आहे. एवढं मोठं मूल सांभाळणं, परत त्याच्या वाढत्या वयाबरोबर वाढते प्रॉब्लेम्स, मानसिक, शारीरिक, कौटुंबिक समस्या यांनाही तोंड द्यावेच लागते. खरी कसरत होते आई-वडिलांची. पोटचं मूल असतं ते आईला तितकंच प्रिय असतं तरी आई त्या मुलाला जास्तीत जास्त जीव लावून त्याची काळजी घेत असते. वडीलसुद्धा त्याचे संगोपन करत असतात. आपण एक जीव जन्माला घातलेला आहे. मग त्याचे संगोपन, पालनपोषण शिक्षण ही जबाबदारी ओझं न वाटता पार पाडली जावी याकडेच त्यांचा कल असतो. खूप माणसं अशी मी पाहिली आहेत की ते जीव लावून आपली जबाबदारी निभावत असतात. अशावेळी पालकांची चिडचिड, ओढाताण, ससेहोलपट सारं निमुटपणे सहन करत सहनशील बनतात पण एकाच वेळी अनेक प्रचंड जबाबदाऱ्या, मानसिक ताण अशा पालकांना सुद्धा कौन्सिलिंगची गरज असते. जीवनात येणाऱ्या टप्प्यावर त्यांनाही धीर, आधार हवा असतो. त्यांचं मन खचलेलं असतं. अति काळजी, दडपण, भीती, नैराश्य आणि पुढे उतारवयात किंवा आपल्यानंतर काय होणार? कोण सांभाळणार? भविष्यकाळाची चिंता भेडसावत असते. खरंतर यावर फार मोठा प्रश्नचिन्ह असला तरी तेही जीवनच आहे. जगायला हवे साथ न सोडता !आपणच जन्म दिलेल्या लेकराला सांभाळून पुढे पुढे चालायला हवे. तेही हिमतीने इतकच म्हणेल.

# सांगा ना जरा...



हलकं-फुलकं
राजश्री वटे

काहीतरी वेगळं करायचं आहे... पण हे "काहीतरी'' काय हे काही सापडत नाही आहे... म्हणून म्हटलं सांगा ना जरा काहीतरी!!

लक्षात नसताना, आवडत नसताना, काहीच सुचत नसताना आणि करायचं म्हणून करायचं काहीतरी... म्हणजेच काहीतरी!! असं वाटतं...

नेहमीच हे "काहीतरी'' कोड्यात पाडतं...
"खायला दे ना मला...''
"काय देऊ?'' "काहीतरी दे''...
हे प्रत्येकाच्या घरातील संवाद... लहानांपासून वृद्धांपर्यंत घडत असतात.

काहीतरी दिलं की, हे नको, ते नको... दुसरं काहीतरी!

आता हे काहीतरी देणं फार कठीण असतं...

हा काहीतरीचा हट्ट पुरवणं फार कठीण असतं!

कोणी जरा विचारात, चिंतेत दिसलं की विचारपूस होते, "काय झालं, काहीतरी सांग ना, काहीतरी बोलना, काहीतरी झालंय नक्कीच''...

ही प्रेमळ विचारपूस काहीतरी झालंय हे जाणून घेण्यासाठी, काळजीपोटी असते, ते काहीतरी ऐकण्यास मन उत्सुक असतं...

"काहीतरी सांगायचंय...
पण आता नाही... सांगेन कधीतरी''...

असं कोणी अर्धवट बोलून सोडून दिलं, तर मनाची चलबिचल वाढते, जाणून घेण्याची उत्सुकता ताणली जाते... काय सांगायचं असेल हे काहीतरी!!

घाईत प्रवासाची तयारी करताना बॅगमध्ये काहीतरी कोंबलं आणि निघालं... पण नेमकं काहीतरी महत्त्वाचे राहूनच जाते. गृहिणी स्वयंपाक करण्यापूर्वी घरच्यांना मोठ्या कौतुकाने विचारते, "काय करू आज जेवणात?''

"काहीतरी कर...''

पण ते काहीतरी केलं, तर लगेच प्रतिक्रिया येते, " हे काहीतरीच करून ठेवलं''!" उशीर होतोय, किती विचार करणार, काहीतरी घाल आणि चल लवकर... " मग ते कपडे असो, चप्पल असो नाहीतर आणखी काही!... हे नेहमीचे संवाद होणारच...


दुकानात शिरल्यावर "काहीतरी गिफ्ट द्यायला दाखवा हो''... असं दुकानदाराला म्हटले जाते... तो ढीगभर "काहीतरी'' दाखवतो... त्यातलं काहीतरी आवडतं, घेतो व बाहेर पडतो दुकानाच्या आणि हुश करतो'' मिळालं काहीतरी एकदाचं''...

एक भाषण एवढं कंटाळवाणं... विषय सोडून काहीतरी पाल्हाळ लावत होतं... असं होतं ना खूपदा!

हे काहीतरीचं पालुपद उठता बसता चालू असतं...
"काहीतरी" हातावर ठेवावं घरी आलेल्याच्या...
बाहेर जाताना "काहीतरी'' तोंडात टाकावं, तसं जाऊ नये...
काहीतरी "किरकिर'' चालू असते एखाद्याची... कसलं " काहीतरी'' हात टिकवतात धडा न वडाचं...
आवडलं नाही की असं निघतंच न तोंडातून! हो की नाही...
लाजून ती म्हणतेच कधीतरी...
"तुमचं आपलं "काहीतरीच" ...!!

# साप्ताहिक भविष्य





मंगेश मधुसूदन महाडिक
६ ते १२ एप्रिल २०२५

## नवीन नवीन मोठ्या संधी प्राप्त होतील

**मेष**

या आठवड्यात आपल्याला भावनेच्या आहारी न जाता कर्तव्याला प्राधान्य देणे हिताचे ठरेल. नोकरी आणि व्यावसायिक क्षेत्रात कामाची व्याप्ती वाढल्यामुळे जास्तीची कामे करावी लागण्याची शक्यता. कोणत्याही प्रकारचा ताणतणाव न घेता आपले काम करण्याच्या प्रयत्नात कमी पडू देऊ नका. नोकरीतील राजकारण आणि गटबाजी यापासून मनस्ताप होण्याची शक्यता. जाणीवपूर्वक दुर्लक्ष करा. आपल्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. व्यवसायामध्ये अचानक उद्‌भवलेल्या काही समस्या व्यवसायावर परिणाम करू शकतात. चर्चेद्वारे समस्यांचे निवारण करता येईल. नवीन नवीन मोठ्या संधी प्राप्त होतील.

## अधिकारांमध्ये वृद्धी होऊ शकते

**वृषभ**

सप्ताह पूर्वार्धमध्ये आपल्याला थोडा संयम बाळगावा लागणार आहे. आपल्या मनाप्रमाणे कार्य होतीलच असे नाही लगेच नाराज होण्याची गरज नाही. आपले प्रयत्न चालू ठेवणे महत्त्वाचे ठरेल. खर्चामध्ये वाढ होईल; परंतु ते खर्च काही चांगल्या कामासाठी होणार आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या वाढत्या मागण्या पूर्ण कराल. विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक यश मिळू शकते. काहींना शिष्यवृत्तीसह परदेशगमनाचे योग. सामाजिक तसेच धार्मिक कार्यात रस घ्याल. सामाजिक प्रतिष्ठेमध्ये वृद्धी होऊन सामाजिक स्तर उंचावेल. काही सभा समारंभ आपल्या उपस्थित होतील. मानाचे स्थान मिळू शकते. लोकसंग्रह वाढेल. आपल्या कार्याची प्रशंसा होईल. नोकरीमध्ये अनुकूल परिस्थिती राहील.

## व्यवहार गतिशील होतील

**मिथुन**

व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहून व्यवसायात केलेले नवीन बदल व्यवसायासाठी पोषक ठरतील. व्यवसाय विस्ताराच्या योजना सफल होतील. व्यावसायिक जुनी येणी वसूल होतील मात्र उधार उसनवारी टाळा. त्याचप्रमाणे जुगार सदृश व्यवहार करू नका. जास्त प्रमाणात जोखीम असलेली कार्य टाळणे हितकारक ठरेल. सरकारी कामांमध्ये कटकटी निर्माण होऊ शकतात. त्याचप्रमाणे विलंब लागून खर्चही होण्याची शक्यता आहे. वाहने सावधानतेने चालवा. तसेच वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे आवश्यक राहील. स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या. दीर्घकालीन रखडलेले मालमत्तेचे व्यवहार गतिशील होतील.

## प्रयत्नांना यश मिळेल

**कर्क**

कोणतेही लहान-मोठे व्यवहार करताना सावधानता बाळगणे गरजेचे ठरेल. त्याचप्रमाणे नव्या गुंतवणुका करताना त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींचा सल्ला उपयोगी पडू शकतो. फसवणुकीची शक्यता अथवा नुकसान. शांतपणे निर्णय घेणे गरजेचे. घाईगर्दीत घेतलेले निर्णय नुकसानदायक ठरू शकतात. व्यवसाय धंद्यात वातावरण जरी सर्वसामान्य असले तरी अचानक काही समस्या उद्‌भवू शकतात. विशेषतः भागीदारी व्यवसायात. भागीदाराबरोबर वाद-विवाद घडून तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्याच्या दृष्टिकोनातून केलेल्या प्रयत्नांना यश मिळेल.

## सामाजिक मानसन्मान

**सिंह**

अनुकूल असे ग्रहमान आपल्याला चांगली फळे देईल. खासगी अथवा सरकारी नोकरीमध्ये पती अथवा पत्नीचा भाग्योदय. पूर्वी केलेल्या कामाचे अपेक्षित फळ मिळेल. पदोन्नती अथवा वेतनवृद्धी सारख्या घटना घडू शकतात मात्र बदलीची शक्यता आहे. कामाच्या स्वरूपात बदल होऊन स्थलांतर होऊ शकते. नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्याची तयारी ठेवणे क्रमप्राप्त ठरेल. सामाजिक मानसन्मान मिळून एखाद्या कार्यक्रमात मानाचे स्थान मिळेल. समाजातील व्यक्तींच्या मार्गदर्शनासह मदत मिळू शकते.

## प्रवास कार्य सिद्ध राहतील

**कन्या**

संमिश्र स्वरूपाचा ग्रह परिस्थितीमुळे कधी कडू, तर कधी गोड स्वरूपाचे अनुभव येऊ शकतात. शांतपणे तसेच पूर्ण विचारांती निर्णय घेणे गरजेचे ठरेल. घरातील मुला-मुलींचे प्रश्न सुटतील; परंतु लहान मुलांच्या आरोग्याकडे लक्ष ठेवा. गर्भवती महिलांनी विशेष काळजी घेणे क्रमप्राप्त ठरेल. वैवाहिक जीवनात सुवार्ता मिळतील. सहकुटुंब, सहपरिवार प्रवासाचे योग आहेत. प्रवास कार्य सिद्ध राहतील. कुटुंबातील वातावरण उत्साही राहील. सहकाऱ्यांचे सहकार्य मिळत राहील.

## सकारात्मक राहणे गरजेचे ठरेल

**तूळ**

सध्याचा कालावधी यशदायी ठरेल. हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात मनाप्रमाणे यश मिळणार आहे मात्र आपल्या कार्यक्षेत्रात आपण सकारात्मक राहणे गरजेचे ठरेल. इतरांचे म्हणणे पूर्णपणे ऐकून त्यावर प्रतिक्रिया द्या, फायद्यात राहाल. शत्रू, हितशत्रू अथवा विरोधक यांच्या कारवाया वाढल्या तरी त्यांच्यावर विजय प्राप्त करू शकाल. कुटुंब परिवार तसेच मित्रमंडळींच्या वर्तुळातील मतभेदांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने मनस्ताप होणार नाही. लहान-सहान गोष्टींवरून मतभेद होऊ शकतात. तरुण-तरुणींचे प्रश्न संपतील. प्रेमात यश मिळू शकते.

## यश प्राप्त होईल

**वृश्चिक**

आपल्या कार्यक्षेत्रात केलेले नियोजन सफल होताना अनुभवता येईल. केलेल्या कष्टाचे फळ मिळू शकेल. मात्र सरकारी प्रकरणातून त्रास संभवतो. सरकारी नियम पाळा. तसेच सरकारी स्वरूपाच्या कामात विलंब लागू शकतो. तसाच खर्च येऊ शकतो. शांत डोक्याने आपले पुढील कार्य करत राहा. सामाजिक जीवनात शत्रू व हितशत्रूंपासून मनस्तापाची शक्यता. विद्यार्थ्यांना दिलेल्या परीक्षेत यश प्राप्त होईल. आपल्या कार्यक्षेत्रात तसेच कुटुंब परिवारात व मित्रमंडळींच्या वर्तुळात वाद-विवाद करणे टाळा. खर्चामध्ये वाढ होईल.

## कार्यविस्तार होईल

**धनू**

आपल्या कार्यक्षेत्रात अथवा कुटुंब परिवारामध्ये असलेल्या जबाबदाऱ्या वाढण्याची शक्यता आहे. खर्चाच्या प्रमाणातही वाढ होईल. कुटुंबातील सदस्यांच्या वाढत्या मागण्या पूर्ण कराल. स्वतःसाठी खर्च कराल. राहत्या घराविषयीचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नरत राहाल. स्वतःचे मालकीचे घर असावे. या स्वप्नपूर्तीसाठी केलेले प्रयत्न यशस्वी होतील. पैशाची सोय होईल. कर्ज मंजूर होईल. व्यवसाय धंद्याचा कार्यविस्तार वाढल्याने काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील.

## कामात काही बदल करावे लागतील

**मकर**

दैनंदिन कामात काही बदल करावे लागतील. आयत्या वेळेस नवीन कामे उद्‌भवल्याने धावपळ होईल. सावध राहून कार्य पूर्ण करा. एकाच वेळेस अनेक कामे करण्याचा प्रयत्न अंगाशी येऊ शकतो. वाहने सावकाश चालवा. आर्थिक व्यवहार सावधानतेने करण्याची गरज नुकसानीची शक्यता. महत्त्वाची कागदपत्रे, मौल्यवान वस्तू, वाहने सुरक्षित ठेवणे गरजेचे ठरेल. चोरीची अथवा गहाळ होण्याची शक्यता. जुने वाहन बदलून नवीन वाहन खरेदी करता येईल. कुटुंब परिवारात लहान-सहान कारणांवरून वाद-विवाद संभवतात. कुटुंबातील सदस्यांबरोबर समन्वय साधने गरजेचे ठरेल. आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील.

## मन :स्वास्थ्य सांभाळा

**कुंभ**

एखाद्या अप्रिय घटनेचा परिणाम कार्यतत्परतेवरती होणार नाही याची काळजी घ्या. नाराज होऊ नका. मन:स्वास्थ्य सांभाळा. छोट्याशा कामाला जास्त वेळ लागला तरी विचलित होऊ नका. खर्चाच्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता. कार्यक्षेत्रात मनाविरुद्ध निर्णय घ्यावे लागण्याची शक्यता आहे; परंतु आपण आपल्या कामावर लक्ष केंद्रित करून कार्यमग्न राहणे गरजेचे ठरेल. सर्वत्र नियोजनाला महत्त्व राहील. नियोजनाला प्राधान्य दिल्यास येणाऱ्या समस्या टाळता येतील. नोकरीमध्ये वरिष्ठांचा विश्वास तसेच त्यांची मर्जी सांभाळण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. गटबाजी आणि राजकारणापासून अलिप्त राहा. जमीन, मालमत्ता संबंधित व्यवहार पुढे ढकला.

## चिंतामुक्त राहाल

**मीन**

अचानक काही खर्च समोर उभे राहिल्याने नियोजनात बदल करावे लागतील. खर्चाचे प्रमाण वाढल्यासारखे दिसेल. व्यवसाय-धंद्यात आर्थिक मदतीची गरज भासू शकते. कर्ज प्रकरणे मंजूर होतील. मित्रमंडळींच्या वर्तुळातून अथवा ओळखीतून ही आर्थिक मदत मिळू शकते. कुटुंब परिवारातून ज्येष्ठ व्यक्तींकडून सहाय्य मिळेल. चिंतामुक्त राहाल. समस्या जरी आल्या तरी त्या सुटतील. प्रयत्नशील राहून कार्यमग्न राहा. कुटुंबामध्ये धार्मिक अथवा मांगलिक कार्य घडण्याची शक्यता. एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन होईल. नोकरीमध्ये पती अथवा पत्नीचा भाग्योदय होऊ शकतो. अचानक पदोन्नती अथवा वेतन वृद्धी मिळेल.



## का हासला किनारा...

का हासला किनारा पाहून धुंद लाट
पाहूनिया नभाला का हासली पहाट?

होती समोर माया, गंभीर सागराची
संगीत मर्मराचे, किलबिल पाखरांची
काठावरी उभी मी, तू न्याहळीत पाठ !

चाहूल जाणिवेची स्पर्शातुनी गळाली
भारावल्या कळीला जणू पाकळी मिळाली
कमलापरी जुळावे ते स्वप्न रम्य हात !

**गीत : जगदीश खेबूडकर**
**स्वर : अनुराधा पौडवाल, शोभा जोशी**



## ऊठ राजसा घननीळा...

ऊठ राजसा
घननीळा हासली रे
वनराणी
उडे थवा पाखरांचा
गात गात मंजुळ
गाणी

यमुनेचं गारगार
खळाळलं आतां
पाणी

ऊठ सख्या
नीलमणी, साद
घालिती गौळणी

नेत्रकमळे उघड
बाळा पुष्प सांगे
डोलुनी

सांगतो रे ऊठ राजा
मंद वारा वाहुनी


जाग आली
गोकुळाला, नाद
छुमछुम पैंजणी

ऐकु येई धेनुची ह
हाक तुझिया अंग

**गीत : शांताबाई जोशी**
**स्वर : माणिक व**

**तैसे आस्थेचां महापुरी |**
**रिघताती कोटीवरी |**
**परी प्राप्तीचां पैलतीरी |**
**विपाईला निगे ॥ ७.१३ ॥**

# तृप्तीचे पैलतीर...





श्री गुरुगाथा

**अरविन्द दोडे**

त्याप्रमाणे स्वरूपज्ञानाच्या इच्छारूपी पुरात कोट्यवधी लोक प्रवेश करतात, पण स्वरूपज्ञानाच्या प्राप्तीच्या पलीकडच्या किनाऱ्याला एखादाच पोहोचतो. म्हणून ज्ञानकथन सामान्य नाहीये. तूर्त विज्ञानाची गोष्ट महत्त्वाची आहे. एकदा का भक्तिभाग्याची सीमारेषा कळली की दुःखाचा डोईवर जो रत्नभार असतो, औचित्याचा सुवर्ण दिवस उगवला की, आरशातली धनसंपदा पाहण्याची सवय जाते. कामक्रोधाघरी आराम करण्याचा करंटेपणा जातो. प्रारब्धाला खोटं ठरवण्याचा आटापिटा थांबतो. निर्जीवाचा साजशृंगार फिका असतो, हा तत्त्वबोध उमजतो. सुखसौंदर्याच्या निमित्ताचा धनी वेगळाच आहे, असा भाव अंतरात अंकुरतो. कुसंगाचा तिरस्कार वाटतो. शब्दांचा पसारा मांडणाऱ्याला स्वतःच्या ज्ञानाचे हित कळत नाही. एकलेपणा हाच आपलेपणा!

गर्व, अभिमान, अहंकार जाळण्यासाठी भक्ताला सात्त्विकतेचा यज्ञ अखंड सुरू ठेवावा लागतो. कुठलाही दगड स्फटिक नसतो, तशी माणसांची पारख करता येते! परिसाचा दगड असतो. दगडाचा परिस करता येत नाही, हे सार गुरू शिकवतो. प्रज्ञेला कोवळी धार लावतो. प्रतिभेला उत्तुंग शिखरावर नेतो. आपली जीवनशैली अन् विचारसरणीही बदलून टाकतो. तो सांगतो, जीवनविषयक काही सत्यं -

आपण किती देखणे आहोत किंवा किती सामर्थ्यवान आहोत, हे महत्त्वाचं नाहीये. माकडसुद्धा दुसऱ्यांचं लक्ष माकडचेष्टांनी वेधून घेतं. आपण कितीही श्रेष्ठत्व प्राप्त केलं तरी मेल्यावर स्मशानापर्यंत स्वतः जाऊ शकत नाही. माणूस कितीही कीर्तिशिखरावर पोहोचला तरी भविष्य पाहू शकत नाही. तुम्ही कितीही गोरेपान असलात तरी अंधारात त्या गोऱ्या रंगाचा प्रकाश पडत नाही, तर दिवा पेटवावा लागतोच. तुम्ही हसला नाहीत तर लोक 'सभ्य' म्हणतील काय? जग तुम्हाला बघून हसणारच! तुम्ही किती धनवान आहात, किती गाड्या अन् किती महाल आहेत, हे महत्त्वाचं नाहीये. शयन वा स्नानगृहापर्यंत स्वतःच्या पावलांनी चालतच जावं लागतं की नाही?

जागे व्हा! जीवनप्रवासात झोपू नका. जागेच राहा, हे तळमळीनं सांगणारा एकमेव अद्वितीय केवळ गुरूच.

**चैतन्यं शाश्वतं शान्तं**
**व्योमातीतं निरंजनम् |**
**नादबिंदुकलातीतं**
**तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ७० ॥**

जो चैतन्यस्वरूप आहे, शाश्वत आहे, शांत आहे, आकाशादींपेक्षा सूक्ष्म आहे, निरंजन आहे, नादातीत आहे, बिंदूतीत आणि कलातीत आहे अशा श्रीगुरूला नमस्कार असो. गुरूचं अविनाशी स्वरूप ह्या श्लोकात आहे.

गुरूपद प्राप्त होण्यास शास्त्राभ्यास पुरेसा नसतो. साक्षात्काराचाही अनुभव हवाच. मन म्हणजे विचार. बुद्धीचं काम निर्णय घेणं. अहंकार म्हणजे जीवभाव. या साऱ्या गोष्टी थंडावल्या की होतं चित्त एकाग्र! त्यासाठी गुरुस्मरण करावं. प्रपंचाला वित्त हवं. प्रकृतीला पित्त हवं. परमार्थाला चित्त हवं.

एक कथा आठवते. गुरूंच्या गोष्टी कथा प्रेरणादायक असतात. कशा ऊर्जा देतात पाहा -

एक होता शेतकरी. त्याचं शेजाऱ्याशी एकदा भांडण झालं. रागाच्या भरात तो वाटेल ते बोलला. घोर अपमान केला. नंतर त्याला पश्चाताप झाला. तो एक सज्जन शेतकरी म्हणून गावात त्याला प्रतिष्ठा होती. तो अखेर आपल्या गुरूकडे गेला. सारा प्रसंग कथन केला,

"गुरुदेव, मी फार वाईट बोललो. माझे शब्द मी परत घेण्यासाठी काय करू?"

"दादा, एक काम करा. पाखरांची पिसं गोळा करा. गावातल्या चौकात पसरून ठेवा."

शेतकरी गेला. पाखरांची पिसं जमा केली. चौकात पसरवून ठेवली. मग गुरूंकडे आला.

"गुरुदेव, तुमच्या आज्ञेप्रमाणे मी केलंय."

"छान! आता संध्याकाळी ती सगळी पिसं पुन्हा गोळा कर अन् घेऊन ये!"

शेतकरी गेला. पिसं सगळी वाऱ्यावर उडाली होती. काही घाणीत पडली होती. तो गुरूकडे परत आला. त्याला रिकाम्या हातानं परत आलेला पाहून गुरुदेवांनी समजावलं,

"एकही पीस आणलं नाहीत तुम्ही! शब्द असेच असतात. बोलल्यानंतर परत घेता येत नाहीत. म्हणून यापुढे बोलताना विचार करा."

असा हा गुरुयोग! जितका सोपा, तितका अवघड.

लोक मात्र एकदम समाधिसुखाच्या गोष्टी करतात. एका जागी निश्चल बसायचा सराव करायला त्यांना वर्ष लागतं. महागुरू जाहिरात देतात, 'शक्तिपातदीक्षा मिळेल.' ज्यांची पात्रता नाही ते देतात काय? ज्यांची योग्यता नाही ते घेतात काय? अध्यात्मगुण अंगी बाणवण्यासाठी आधी वृत्ती बदलावी लागते, हेही माहीत नसतं हजारो महाशिष्यांना! भक्तियुक्त ज्ञान म्हणजे नामदेव अन् ज्ञानयुक्त भक्ती म्हणजे ज्ञानदेव! माउली म्हणतात,

'ज्ञानियांच्या घरी | भक्तीचा दुष्काळ ॥'

'गीते'त प्रत्यक्ष भगवंत आपली अनुभूती सांगत असूनही नम्रपणे सांगतात, "अर्जुना, हे माझं नाहीये. कुणीतरी यापूर्वी असं म्हटलंय. ते मी ऐकलंय." कृष्ण स्वतःच सर्वज्ञानी, सर्वज्ञाता आहे, पण तो हे माझं आहे, असं म्हणत नाही. 'मी' महत्त्वाचा नाहीये. ज्ञान महत्त्वाचं आहे. कर्ता असूनही कर्तेपणा दुसऱ्याला दिला की कृतीचं मोल शतपटीनं वाढतं.

प्राप्तीचे पैलतीर गाठण्यासाठी काय करतात?

एक झेनकथा आहे. ती सांगण्यापूर्वी एक खुलासा करायला हवाय. झेन म्हणजे ध्यान. प्राचीन काळात बौद्धधम्माला 'ध्यान संप्रदाय' हे नाव होतं. बोधिधर्मानं हा धम्माचा भिक्खू होता. त्यानं कुंग फूचा प्रसार चीनमध्ये केला. तो वशीकरणविद्येत प्रवीण होता. सुमारे पाचव्या शतकात तो चीनमध्ये गेला. तो इतका श्रेष्ठ होता की, 'दुसरा बुद्ध' म्हणून लोकप्रिय झाला. प्रतिष्ठा पावला. शाओलिन मंदिरात कुंग फू शिक्षण त्यानं सुरू केलं. कालांतराने जपान आणि कोरियामध्ये ही विकसित झालं. झेन हा महायान पंथाचा एक उपपंथ.

झेन म्हणजे चिंतन, मनन, समाधी आणि विश्व आणि मानवी जीवन यांचं स्वरूप जाणून घेणं. विचार केंद्रित करणं. बुद्धत्व प्राप्त करून घेणं. उगाच सूत्रं आणि सिद्धांत न देता, 'ध्यान करा' हा संदेश. गुरू महत्त्वाचा. त्यास झेनगुरू किंवा झेनमास्तर म्हणतात.

तर एक झेनकथा -

एक झेनसाधक नदीच्या पैलतीरावर उभा होता. नदीला पूर होता. त्यानं ओरडून गुरूला विचारलं,

"मी पैलतीरावर येऊ कसा?"

गुरूंनी ओरडून उत्तर दिलं,

"तू पैलतीरावरच आहेस!"

कळला अर्थ? नाही ना? अंतर्मुख व्हा. शोध घ्या. झेनकथेत तात्पर्य नसतं. उत्तर आपण शोधायचं असतं!

जय गुरुदेव!

**(arvinddode@gmail.com)**



जीवनविद्येच्या वैश्विक तत्त्वज्ञानाच्या आनुषंगाने आमचे सांगणे हेच आहे की, मुलांना प्रथम मानवधर्माचे संस्कार दिले पाहिजेत. त्यांना मानवधर्म कशात आहे याची, म्हणजेच समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान, नम्रता, लवचिकता, कृतज्ञता या सद्गुणांची थोडक्यात जाणीव करून द्यायची. मानवधर्मात या आठ गोष्टी अंतर्भूत आहेत. या आठ गोष्टी सर्वांना शिकविल्या की जग सुखी झालेच. जर सर्वांनी या गोष्टी शिकल्या आणि आश्चर्यच प्रयत्न सुरू केला तर मग खरोखरच जग सुखी व्हायला किती वेळ लागेल? आज धर्माची जी शिकवण दिली जाते त्याने माणसे आकुंचित होतात. याला इंग्रजीमध्ये Conditioned Mind म्हणतात. त्या संस्कारांनी तुमची बुद्धी व मन संकुचित होते. ते इतके संकुचित झालेले आहे की प्रत्येक व्यक्ती स्वार्थी झालेली आहे. त्या स्वार्थाच्या पोटी तो काहीही करायला तयार होतो. वाघ कितीही उपाशी असला तरी भुकेपोटी गवत खात नाही, त्याचप्रमाणे काहीही झाले तरी माणसाने ही माणसासारखेच मानवधर्माला अनुसरून वागायला हवे. समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता, समाधान, नम्रता, लवचिकता, कृतज्ञता या आठ गोष्टीत मानवधर्म आहे. या गुणांचे वैशिष्ट्य म्हणजे ह्यातला कुठलाही गुण जरी आचरणात आला तरी त्याठिकाणी बाकीचे गुण ओघाने येतातच. तसे हे सर्वच गुण महत्त्वाचे, पण यातला सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे कृतज्ञता. सुरुवातीपासूनच कृतज्ञतेची शिकवण द्यावी. काय शिकवावे? तू कृतज्ञ राहा. कोणाशी? आई, वडील, गुरू, सद्गुरू, समाज, राष्ट्र, विश्व या सर्वांप्रती तू कृतज्ञ राहा. या सर्वांमुळे तू आहेस. देवाशीही कृतज्ञ राहा. या सर्वांशी तू कृतज्ञ राहिलास ना तर तुला जीवनात सर्व काही मिळेल. कृतज्ञतेसारखी उपासना नाही. देवाला फळे, फुले वाहण्याची काही गरज नाही. तू देवाप्रती सतत कृतज्ञ राहा.

**डोळ्याने बघतो, ध्वनी परिसतो, कानी पदी चालतो, जिव्हेने रस चाखितो, मधुरही वाचे आम्ही बोलतो, हाताने बहुसाल काम करितो, विश्रांतीही घ्यावया, घेतो झोप फिरुनी सुखेची उठतो ही ईश्वराची दया.**

इथे कृतज्ञता व्यक्त केलेली आहे. अरे डोळ्याने मी बघतो, कानाने ऐकतो, तोंडाने मी बोलतो, पायांनी चालतो ही सर्व देव तुझीच कृपा. किती कृपा? पोटात गेलेले अन्न देवा तू पचवलेस. मी पचवले का? नाही, कारण ते कधी पचले हे मला समजले सुद्धा नाही. त्यातून पोषण मिळाले, रक्त निर्माण झाले ही सर्व सुद्धा देवाचीच कृपा. देवाचे किती आभार मानायचे? मी या आधी सांगितल्याप्रमाणे जगात प्रत्येक गोष्ट महत्त्वाची आहे. प्रत्येक वस्तू, प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक प्राणी, प्रत्येक झाड महत्त्वाचे आहे. हे ओळखण्यात धर्म आहे. कारण का? सर्वरूपाने तो परमेश्वरच प्रकट झालेला आहे. त्याच्याशिवाय आहेच कोण? पण आपल्याला याचा विसर पडला आहे. म्हणून देवाचे स्मरण झाले पाहिजे. "स्मरण देवाचे करावे." आता हे देवाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करायचे की नाही हे तू ठरवं, कारण तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार.



जीवन संगीत

**सद्गुरू वामनराव पै**

# सर्वस्वी राहावे रामास अर्पण।



आता ऐका माझे वचन । मनाने व्हावे रामार्पण ॥ माझे नातेगोते एक राम । हा भाव ठेवून जावे रामास शरण ॥ अनन्य व्हावे भगवंती । जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥ रामा आता करणे नाही उरले जाण । तुला आलो मी अनन्य शरण ॥ सुखदुःखाचा दाता । सत्य नाही दुजा आता ॥ जाणिवेने जैसे घ्यावे । तैसे मनाने सुखदुःख भोगावे ॥ मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण । तोपर्यंत नाही समाधान ॥ सर्वस्वी राहावे रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ॥ रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती । त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥ प्रयत्नेविण राहो नये । फळाची आशा ठेवू नये । भगवंताला विसरू नये । कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ॥ प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान । तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ॥ अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥

वृत्ती राखावी अत्यंत शांत । हेच संताचे मुख्य लक्षण जाण ॥ जे जे घडेल काही। ते ते रामइच्छेने पाही॥ असा करावा संसार । परि असावे खबरदार । त्राता राम जाणुनी चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ती। थोर भाग्य उदया आले । रामराय घरी आले। आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ॥ न दुज्याचा दोष पाहावा । त्याचा आपणापाशीच ठेवा ॥ देह आहे परतंत्र । मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ॥ मनाने जो बांधला । परतंत्र वाटेल त्याला ॥ शरण गेला रामचरणी । त्याला नाही दुजी हानि ॥ अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ॥ बायको मुले, लहान थोर । यांनी न सोडावा रघुवीर ॥ काळ फार कठीण आला । बुद्धिभेद त्वरित झाला ॥ आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण न जाऊ द्यावा क्षण । चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ॥ माझा राम जोडला हे जाणले ज्याने । त्याला न उरले करणे॥ राम ठेवील ज्या स्थितीत । त्यात समाधान मानावे ॥ रामास जे करणे असेल । ते तो करील ॥ सदा सर्वकाळ माझ्याशी वास । हाच धरावा हव्यास ॥ त्याला न जावे लागे कोठे । घरबसल्या राम भेटे ॥ जो करी रामपदांबुजचिंतन । तयास नाही यमाचे बंधन ॥ संताची सेवा केली । महद्भाग्य घरी आले॥ एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ॥ तोच खरा धन्य धन्य ॥ संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास ॥

**तात्पर्य : अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥**



अध्यात्म

**ब्रह्मचैतन्य**

**श्री गोंदवलेकर महाराज**

# अधोरेखित गोंदण वाट

काल धनंजय गेला. कॉलेजमधला अतिशय हरहुन्नरी, कलाकार आणि लाघवी असा आमचा अतिशय छान मित्र अचानक आमच्यातून गेला. तो आता कधीही दिसणार नव्हता. मनाला अजिबात पटत नव्हतं. पण मृत्यू हे एक असं सत्य आहे की जे कितीही नाकारावसं वाटलं तरीही अटळ असं सत्य आहे. प्रत्येक सजीवाच्या जन्मासोबतच त्याच्या मृत्यूची तारीख, वार आणि वेळ ही लिहिलेली असतेच. जन्म आणि मृत्यू यातील प्रवास म्हणजे हे 'जीवन'. कुणी कसं जगायचं हे ज्याचे त्याने ठरवायचे असते. आज आमच्या मित्राच्या धनंजयच्या मृत्यूनंतर जाणवली ती एका जिवलग मित्र, सहकारी आणि एक उत्तम समाजसेवक गमावल्याची पोकळी.

प्रत्येकाच्या आयुष्याच्या या कॅन्व्हासवर कसे आणि कोणते रंग भरायचे हे ज्याच्या त्याच्या हातात असते की, ज्याला आपण आपले कर्म म्हणतो. काय वाटत तुम्हाला की टाटा असो अगर बिर्ला, सुषमा स्वराज असो अगर अगदी तुमच्या कंपनीचे सीईओ, संसारिक विवंचना कुणाला चुकल्या आहेत का? नाही ना? कदाचित प्रत्येकाची जीवन जगण्याची शैली ही वेगवेगळी असेल पण रोजच्या जीवनात आपण जे काही करतो त्या सर्व गोष्टी या आपल्या कर्मात मोडतात आणि त्याच आपल्याला जीवन मृत्यूच्या फेऱ्यातून पुढे मोक्षाकडे नेतात.

आत्मा हा प्रवासी आहे, तर आयुष्य हा एक प्रवास, की ज्यात प्रत्येक नाते हे एक स्टेशन आहे. कुठल्या स्टेशनवर किती वेळ थांबायचे हे विधिलिखित आधीच ठरलेले आहे. त्यामुळे प्रवासातील प्रत्येक स्टेशनवर सुखद की दुःखद कशा आठवणी ठेवायच्या ते फक्त आपल्या हाती काही प्रमाणात असते. काही प्रमाणात असं जे मी म्हटलं ते अशासाठी कधीकधी आपण कितीही योग्य वागलो तरीही समोरची व्यक्ती आपल्या कृतीचा अर्थ कसा घेते यावर तसेच त्याच्या परिणामावर, पर्यायाने निर्माण होणाऱ्या आपल्या कर्माच्या फलितावर अवलंबून आहे. इथे एक साध उदाहरण देते, पासबुक प्रिंटर बंद पडल्यावर जर आपल्याला पासबुक प्रिंट करून मिळाले नाही, तर यात जगावेगळे ते काय आहे पण समोरच्या कर्मचाऱ्याने, की ज्याची आणि आपली यापूर्वी कधीच भेट झालेली नाही त्याने, 'मी बँकेचा संचालक आहे आणि मला ओळखलं नाही' हा राग धरून जर त्या कर्मचाऱ्याला फैलावर घेण्यात आणि त्याला जबर शिक्षा देण्याची सोय आपण केली तर त्यात काय अर्थ आहे? यात त्या कर्मचाऱ्याची ती काय चूक? पण त्याचे कर्मभोग की ज्याक्षणी ते अनोळखी संचालक पासबुक प्रिंट करायला यावेत आणि नेमके त्याच क्षणी ते प्रिंटिंग मशीन बंद असावं. इथे मी जे म्हटले ते तुम्हाला पटेल की, 'आपले कर्म हे काही प्रमाणात आपल्या हातात असते.'


अशावेळी जर कर्माचे फलित चुकीचे मिळाले तर आपल्याला एकटेपणाची किंवा न्यूनतेची भावना मनात घर करून राहते. पण जर उलट विचार केला तर असे लक्षात येईल की, आपण आपले काम सचोटीने केलेले आहे आणि तरीही समोरच्याने गैरसमजातून किंवा स्वतःच्या अहंकारातून कृती केलेली आहे म्हणजेच आपल्या एका कुठल्या तरी चुकीच्या कर्माची गाठ सुटली आहे आणि आपण त्या व्यक्तीच्या कुठल्या तरी ऋणातून मुक्त झालेलो आहोत तर मग आपण मुक्तीच्या मार्गावर एक पाऊल पुढे सरकतो आणि अशा प्रकारे त्या व्यक्तीचे आपल्या आयुष्याच्या प्रवासातील एक स्टेशन आपोआपच कमी होते की, ज्यामुळे आपला उर्वरित प्रवास तर सुखकर होतोच पण त्याचबरोबर पुढील जन्मी हे एक स्टेशन ही कमी होते; परंतु जर त्याने मला त्रास दिलाय आता मी त्याचा सूड घेईन अशी भावना जर आपण बाळगून राहिलो तर मात्र ते ओझे आपल्याला पुढील मार्गात अडसर बनू शकते आणि पुन्हा एकदा ते सुडाच्या नात्याचे एक स्टेशन पुढील जन्मी परत आपल्या आयुष्याच्या प्रवासात येतेच येते, हाच कर्माचा नियम आहे. आता राहता राहिला प्रश्न तो धनंजय सारख्या अतिशय पायस व्यक्तीचा अकाली मृत्यू. इथे आलेल्या प्रत्येकाला ईश्वराने काहीना काही कार्यभाग हा नेमून दिलेला असतो. तो त्या त्या आत्म्याच्या पिंडानुसार. काहींचा पिंड हा ईश्वरी अंश असतो तर काहीच सामान्य तर काहीजणांत राक्षसी गुणांचा अंतर्भाव असतो. काही व्यक्ती या इंद्रधनूसारख्या असतात. सर्वांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या. कायम समाजासाठी धडपडणाऱ्या. त्यामुळे यात देशांतारास निघालेल्या या आत्मरूपी पक्षांच्या पंखाना किती काटे अडकलेत म्हणजेच या जन्मातील नात्याच्या स्टेशन्सची किती परतफेड राहिली आहे त्यावर त्यांचे वास्तव्य अवलंबून असते. परतफेड झाली की सारं संपतं. 'परत ते पाखरू फिरून त्या झाडाच्या वळचणीला येऊन विसावत नाही.' हे सत्य जर लक्ष्यात आले तर कुणाच्याही होणाऱ्या अकाली मृत्यूचे कारण आणि अर्थ आपल्या ध्यानात आल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचे झाले तर,

**ऋतू बदलाचा प्रारंभ होतो जन्मजात...**
**ओळखून पाऊल टाक अंगमोडणी वाटेवर...**
**सुकलेली एक एक डहाळी अन...**
**तुटलेली एक एक चांदणी...**
**करते तुझ्या आयुष्याची...**
**गोंदण वाट अधोरेखित...**




ऋतुराज

**ऋतुजा केळकर**



# श्री रामदूतं शरणं प्रपद्ये!



**।। मनोजवं मारुततुल्यवेगमं**
**जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं**
**श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।**

**अर्थ :** जो मनाइतका वेगवान आणि वाऱ्यासारखा वेगवान आहे, जो इंद्रियांचा स्वामी आहे आणि त्याच्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेसाठी आणि विद्येसाठी सन्मानित आहे, जो वाऱ्याचा पुत्र आहे आणि वानरांमध्ये प्रमुख आहे अशा या श्री रामाच्या दूताला, मी साष्टांग नमस्कार करून शरण जातो...

हनुमानाचा जन्म चैत्र पौर्णिमेला मंगळवारी सूर्योदयानंतर झाला. त्यांचा जन्म चित्रा नक्षत्र आणि मेष लग्नादरम्यान झाला. भगवान हनुमान हे महादेवाचे अवतार आणि अष्टसिद्धी आणि नवनिधीचे धारक असल्याचे म्हटले जाते. त्यांच्या जन्माच्या अनेक कथांपैकी ही कथा सांगितली जाते.

अंजना ही एक शापित अप्सरा होती. तिने लहानपणी खेळताना वानर रूपात तपश्चर्या करत असलेल्या ऋषींच्या अंगावर फळे फेकल्यामुळे त्या ऋषींची तपश्चर्या भंग पावली आणि त्यांनी तिला छाप दिला की ज्या क्षणी तू एखाद्या पुरुषाला आवडशील त्याक्षणी तुझे वानरीत रूपांतर होईल. वयात आल्यावर तुझे वानररूपी माणसाशी लग्न होईल. हे ऐकताच ती रडू लागते आणि त्या ऋषींची क्षमा मागते तेव्हा ते तिला उःशाप देतात की तुझ्या पोटी पराक्रमी शक्तिशाली बालक जन्माला येईल. एकदा अंजना अरण्यात फिरत असताना वानरराज केसरी तिला दिसतात आणि ती त्यांच्याकडे आकर्षित होते. ते अंजनाकडे बघतात इतक्यात तिचे वानरीत रूपांतर होते. ती रडायला लागते. वानर राज केसरी तिला कारण विचारतात. तेव्हा ती स्वतःबरोबर घडलेली सर्व घटना त्यांना सांगते. ते तिला लग्नाची मागणी घालतात. अशा रीतीने दोघांचा विवाह होतो; परंतु बरेच वर्षे झाली तरी पुत्र होत नसल्याने दोघेही शंकरांची तपश्चर्या करतात. त्यांच्या घोर तपश्चर्येने शंकर प्रसन्न होतात आणि वर मागायला सांगतात. तेव्हा अंजनी तुमचा अंश माझ्या उदरी जन्मास यावा असा वर मागते. शंकर तथास्तु म्हणून अंतर्धान पावतात. इकडे राजा दशरथ पुत्र होण्यासाठी आपल्या तीनही राण्यांसमवेत पुत्र कामेष्टी यज्ञ करायला बसतात. तेव्हा अग्नीदेव प्रसन्न होतात आणि प्रसाद म्हणून तीन फळे तिन्ही राण्यांना देतात. त्यातले कैकयीचे फळ एक घार येऊन पळवते. सुमित्रा आपल्यातले अर्धे फळ कैकयीला देते. इकडे शंकरांच्या आज्ञेनुसार पवनदेव वेगाने वाहून ते फळ शंकराचे ध्यान करीत असलेल्या अंजनीच्या ओटीत टाकतात. अंजनी शंकराचा प्रसाद म्हणून ते फळ ग्रहण करते. शंकरांच्या वरदानामुळे देवी अंजनीला चैत्र शुद्ध पौर्णिमेला तेजस्वी असा पुत्र होतो. पवनदेवांमुळे तो प्रसाद देवी अंजनीच्या ओटीत पडल्यामुळे पवनदेवांना हनुमानाचे धर्म पिता असे मानतात. रामायणात हनुमानांची महत्त्वाची भूमिका होती. रावणाचा वध करण्यासाठी जसा विष्णूंनी रामाचा अवतार घेतला तसा विष्णूंना सहायता करण्यासाठी शंकरानीही अवतार घेतला. म्हणून हनुमानांना अकरावा रुद्रावतार म्हणतात. हनुमान हे भक्ती आणि शक्तीचे प्रतीक आहेत. त्यांनी आपल्या शक्तीच्या जोरावर देवी सीतेला शोधण्याचे महत्त्वाचे कार्य केले. असे म्हणतात की हनुमानांना लहाणपणीच असिम शक्ती आणि देवी देवतांकडून वरदान प्राप्त झाले होते. त्यामुळे ते खूप मस्तीखोर होते. आश्रमात राहणारे ऋषीमुनी जेव्हा याग, यज्ञ करीत तेव्हा हनुमान धुमाकूळ घालीत असत. यज्ञ चालू असताना त्यात फळे वैगेरे फेकत असत. त्यामुळे ऋषींनी त्यांना शाप दिला की ते आपली सगळी शक्ती विसरतील आणि जेव्हा कोणी त्यांना त्यांच्या शक्तीची आठवण करून देईल तेव्हा त्यांना ती आठवेल आणि म्हणूनच जेव्हा देवी सीतेला समुद्र पार जाऊन शोधण्याचे कार्य हनुमानांवर सोपवले तेव्हा सर्वप्रथम जांबुवंतनी हनुमानांना त्यांच्यामध्ये असलेल्या शक्तीची आठवण करून दिली. हनुमानांना चिरंजीव राहण्याचा वर मिळाला आहे. प्रभू श्रीराम जेव्हा आपला अवतार संपवायला निघाले त्यावेळी हनुमान सुद्धा त्यांच्या सोबत निघाले तेव्हा प्रभू श्रीरामांनी त्यांना थांबवले आणि कलियुगात तुझी गरज आहे. कलियुगाच्या रक्षणासाठी आणि माझ्या भक्तांच्या रक्षणार्थ तुला पृथ्वीवर राहावे लागेल असे सांगून त्यांना चिरंजीव रहाण्याचा वर दिला आणि म्हणूनच आजही हनुमान पृथ्वीवर आहेत. ते श्रीरामांचे परम भक्त असल्यामुळे जिथे जिथे रामकथा सांगितली जाते तिथे तिथे त्यांचे अस्तित्व जाणवते. अजूनही रामकथा किंवा रामलीला जिथे चालू असेल तिथे सर्वात आधी त्यांच्यासाठी आसन घातलं जातं. अशीही मान्यता आहे की ते जेव्हा कथेला येऊन बसतात तेव्हा हवेचा एक झोत जाणवतो आणि आपण जो दीप प्रज्वलित केलेला असतो त्याचा प्रकाश मोठा होतो. तसेच असेही मानले जाते की, कलियुगात त्यांचं वात्सव्य गंधमान पर्वतावर आहे. हा पर्वत कैलास पर्वताच्या उत्तरेला आहे. अशीही एक आख्यायिका आहे की, अज्ञातवासाच्या काळात भीम जेव्हा पूजेसाठी सहस्त्रदल कमळ आणायला गंधमान पर्वतावर गेले होते तेव्हा हनुमानांनी त्यांचा रस्ता अडवून भीमांचे गर्वहरण केले. आजही ते त्या पर्वतावर एका गुफेमध्ये रामनामाचे ध्यान करीत आहेत. जेव्हा जेव्हा रामभक्त संकटात असतात तेव्हा तेव्हा संकटमोचन हनुमान भक्तांच्या संकटाचे हरण करण्यासाठी धावून येतात...



मनाचा गाभारा

**अर्चना सरोदे**

# पत्रकारांनी सकारात्मक बातम्यांना अधिक स्थान द्यावे

**बबन जोगदंड**

## उल्हासनगर येथे प्रशिक्षणाचा कार्यक्रम

पुण्यभूमी प्रतिनिधी

उल्हासनगर : प्रशासकीय कामकाजातील दोष शब्दबद्ध करण्यापूर्वी प्रशासनातील चांगल्या कामाची बाजू मांडून पत्रकारांनी सकारात्मक बातम्यांना अधिकाधिक स्थान द्यावे. तसेच पत्रकारांनी प्रशासनात घडणारे चांगले बदलही नागरिकांसमोर प्रकाशझोतात आणून आपण राहत असलेल्या शहराचे नावलौकिक करावे, असे मार्गदर्शन यशदाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी उल्हासनगरातील पत्रकारांना केले.महानगरपालिकेच्यावतीने आयोजित एका प्रशिक्षणासाठी डॉ. बबन जोगदंड आले असता, त्यांनी स्थायी समिती सभागृहात पत्रकारांशी संवाद साधून त्यांना विद्यमान पत्रकारितेबाबत अवगत केले. यावेळी महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी अजय साबळे उपस्थित होते. प्रशासन, राजकारण व मानवी जीवनात पत्रकारितेला मोठे स्थान आहे. पत्रकारांमुळेच अन्याय, अत्याचाराला वाचा फुटते. प्रशासन असो की राजकारण याठिकाणी अनेक सकारात्मक गोष्टी घडत असतात. त्या प्रतिबिंबित करून पत्रकारांनी अशा घटना, घडामोडींना प्रामुख्याने प्रकाशित करावे. त्याचबरोबर प्रशासनात घडणारे अनपेक्षित अशा चांगल्या पान २ वर



**पत्रकारांच्या एकजुटीचे कौतूक**

डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शन कार्यक्रमाला पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील सर्व पत्रकार एकदिलाने एकत्रित असल्याचे बघून त्यांनी पत्रकारांच्या एकजुटीचे कौतूक केले. असे खेळीमेळीचे चित्र अभावानेच दिसते अशी पोचपावती त्यांनी दिली.

### डॉ.बबन जोगदंड यांचे विशेष कार्य

जोगदंड यांनी आतापर्यंत पंधरा विषयात पदव्या व दहा विषयात पदविका असे २५ विषयात अभ्यासक्रमा पूर्ण केले. त्यांनी पत्रकारितेसह लोकप्रशासन या दोन विषयात पी.एच.डी संपादन केल्या आहेत. ते महाराष्ट्र शासनाची शिखर प्रशिक्षण संस्था असलेल्या यशदा या संस्थेमध्ये माध्यम व प्रकाशन केंद्राचे प्रमुख तथा जनसंपर्क अधिकारी म्हणून गेल्या २१ वर्षांपासून कार्यरत आहेत. चांगले अभ्यासक, लेखक, विचारवंत असणारे डॉ. जोगदंड यांची आतापर्यंत आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी अनेक वर्तमानपत्रांमध्ये प्रशासकीय सुधारणा व अन्य विषयावर अनेक लेख लिहिले आहेत. महाराष्ट्रातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांना तरबेज करणारे डॉ. जोगदंड यांचा प्रचंड जनसंपर्क असून त्यांच्या संपर्कावर आधारित मानवी संबंधाचा बादशहा हे पुस्तक प्रकाशित झालेले आहे.

# भगवान महावीरांचा जन्मोत्सव उत्साहात

अभिवादन: रथ अन् पालखीतून मिरवणूक



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:संपूर्ण विश्वाला शांती व हिंसेचा संदेश देणारे भगवान महावीर स्वामीजी यांचा जन्मोत्सव गुरुवारी विविध धार्मिक कार्यक्रमासह महावीरांच्या प्रतिमेची सजवलेला रथ अन् पालखीतून सवाद्य शहरातून शोभायात्रा काढून जन्मोत्सव जयघोष करीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये सकल जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आष्टी तालुक्यातील कडा शहरात अहिंसेचे पुजारी भगवान महावीरांचा गुरुवारी जन्म कल्याणक महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त कडयातील जैन मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमासह महावीरांच्या प्रतिमेची मुख्य मार्गावरून शोभायात्रा काढून यामध्ये तिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर कीअसा जयघोष करण्यात आला. शोभायात्रेत सकल जैन श्रावक-श्राविका मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते. त्यानंतर जैन स्थानकात शोभायात्रेचा समारोप झाला. येथील जैन मंदीरात जैन साध्वी आर्यिका रत्न सफलमती माताजी यांच्या उपस्थितीत महावीरांचा जन्म कल्याणक महोत्सव पान २ वर

# लोणारमध्ये भव्य शोभायात्रा

अध्यात्मिक:भगवान महावीर जयंती उत्साहात



पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार: भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त लोणार शहरात आज (गुरुवार) भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्रिशला नंदन वीर की जय, बोलो महावीर की जय च्या घोषणांनी संपूर्ण शहरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले. सजाओ घर को गुलशन से, के महावीर आये हैं अशा गीतांनी शहरात आनंदोत्सवाचे रंग भरले. शोभायात्रेने लोणार नगरी दुमदुमून गेली. या शोभायात्रेची सुरुवात सकाळी जैनमंदिर पासून सकळी ८ वाजता झाली.भगवान महावीर यांच्या प्रतिमेसह आकर्षक आणि देखण्या रथाने शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले.रथाच्या पुढे चौदास्वप्नांचेदर्शन घडवणाऱ्या चिमुकल्या बालिकांनीमनमोहक वेषात सहभाग घेतला.लेझीम पथकाच्या तालावर शोभायात्रेला उत्साहपूर्ण रंग मिळाला. या शोभायात्रेत जैनसाध्वीप. पू.पुष्पदंताश्रीजीमारासा,डॉ.हर्षरत्नाश्रीजीम ारासा, दर्शरत्नाश्रीजीमारासा व प.पु. काव्यरत्नाश्रीजी मारासा यांची प्रेरणादायी उपस्थिती लाभली. त्यांच्या सान्निध्यात जैन समाजाचे श्रावक,श्राविका,युवक व युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शहरातील प्रमुख चौकात आणि रस्त्यांवर शोभायात्रेचेस्वागतकरण्यातआले. विविधभागांतील मान्यवरांनी शोभायात्रेचे स्वागत करून भ.महावीर जन्म कल्याणकाचे औचित्यसाधले.संपूर्ण मार्गावर भक्तांनी सजावट केली होती, घरांच्या गॅलऱ्यांतून व छतांवरून शोभा यात्रेचे दर्शन घेतले जात होते. भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य, अपरिग्रह या तत्त्वज्ञानाचे स्मरण करीत ही शोभायात्रा शांतता, संयम आणि समतेचा संदेश देत होती. संपूर्ण लोणार शहर महावीरमय झाल्याचे दृश्य पाहायला मिळाले. शोभायात्रेची सांगता आनंद मंगल भवन मध्ये प्रार्थना व आरतीने करण्यात आली. या भव्य शोभायात्रेचे आयोजन सकल जैन समाजाच्या वतीने करण्यात आले होते. शहरातील सर्वच घटकांनी एकत्र येत या दिवशी धार्मिक,सामाजिक ऐक्याचेदर्शन घडवले. या धार्मिक सोहळ्यामुळे लोणार शहरात शांतता,समतेचा आणि अहिंसेचा संदेश रुजवण्यास मदत झाली.भ.महावीर जन्मकल्याणक निमित्त पार पडलेली ही शोभायात्रा लोणारच्या इतिहासात एक संस्मरणीयपर्व ठरली.भगवान महावीर जन्मकल्याणक निमित्त विहारसेवाग्रुपच्या वतीने लोणार शहरात भव्य आरोग्य शिबीर, रक्तदानशिबीर व रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरातनागरिकांनीमोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.यामध्ये लोणार व मेहकर येथीलतज्ज्ञडॉक्टरांनी तसेच स्थानिक ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपली सेवा दिली. विशेष म्हणजे जळगाव येथील डॉ.उल्हासपाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टरांच्याचम ूनेदेखीलयाशिबिरातअतुलनीय सेवा बजावली. शोभा यात्रे दरम्यान संपूर्ण शहरातधार्मिक व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.या शोभायात्रेच्या स्वागतासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते.तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष राजेश मापारी,माजी नगराध्यक्षा सौ. रंजना मापारी,भूषण मापारी,शांतीलाल गुगलिया,शहर कॉंग्रेस अध्यक्ष शेख समद, माजी नगरसेवक नितीन शिंदे,जिल्हा युवक कॉंग्रेस अध्यक्ष अनिकेत मापारी,युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष विलास मोरे यांनी भगवान महावीरांच्यामूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे शोभायात्रेला पान २ वर

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रम

आवाहन:हनुमंत गळगटे,नागेश गवळींचे व्याख्यान

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कड्यात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, बाजार समितीचे कमिटीचे सचिव हनुमंत गळगटे, डॉ. नागेश गवळी, नितीन चंदनशिवे यांच्या व्याख्यानासह विविध कार्यक्रमांचे करण्यात आले आहे.

कडा शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बहुजन विचारांची मुलुख मैदानी तोफ डॉ. नागेश गवळी यांचे शिवराय ते भिमराय या विषयावर तर कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हनुमंत गळगटे यांचे महात्मा फुले, लढा समाज परिवर्तनाचा या विषयावर व्याख्यान होणार आहे. प्रसिद्ध गायक राहुल साठे यांच्या भीमराव जबरदस्त या महापुरुषांच्या गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम त्याचप्रमाणे डॉ.



बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा व देखावा, भव्य मिरवणूक, न्यू स्वर संगीत बॅन्जो, संविधान देखावा तसेच हलगी पथक, सनई वाद्य पथक, संबळ पथक, पेपर ब्लास्ट लाईट्स शो असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. तसेच सामाजिक दायित्वाची जाण ठेवून रक्तदान, नेत्र तपासणी व सर्वरोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन भिमजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुन्हा एकदा केवायसी मुद्दतवाढ

हेमंत ढोकले: ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:अन्नसुरक्षा योजना अंतर्गत गरीब गरजूंना मोफत रेशन व स्वस्त धान्याचा पुरवठा होतो त्या योजनेचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी करण्याची प्रक्रिया राज्य सरकारने हाती घेतली आहे त्यामुळे बनावट लाभार्थ्यांना शोध ई- केवायसी तुन लागणार आहे ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अनेकदा मुदतवाढ देण्यात आली होती अनेक कार्ड धारकांनी ई- केवायसी न केलेल्याने ३० एप्रिल २०२५ पर्यंत परत एकदा सरकारने मुदत वाढ देउन ई-केवायसी करण्याची प्रक्रिया चालू आहे सदर कार्ड धारकांची ई केवायसी १००% होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने या अगोदर अनेक वेळा ई केवायसी करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात आली होती तरीपण शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी आज तगायत १००% ई केवायसी पूर्ण न केल्याने परत एकदा सरकारने ई



केवायसी करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी मा .सचिव अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मुंबई यांच्याकडून झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स मध्ये सदर लाभार्थ्यांची दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत ईकेवायसी १००% पुर्ण झाली पाहिजे तसेच यापुढे ईकेवायसी करण्यासाठी मुदत वाढ दिली जाणार नाही आणि ज्या कार्डधारकांचे ईकेवायसी झालेली नाही अशा कार्डधारकांना धान्य मिळणार नाही असे आदेश देण्यात आले आहेत दरम्यान ईकेवायसी करून घेण्यासाठी कोणत्याही रेशन दुकानात जाऊन तसेच चेलळश्रश रीद्विारे या दोन्ही प्रकारे करता येईल त्यासाठी केंद्र सरकारने आता Mera e-kyc mobile app d adhar face RD service app सुरू केले आहे तरी सदरील पचा वापर करण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा १) गुगल प्ले स्टोअर वरून Mera e-kyc mobile appd ddhar face RD service appडाउनलोड करून इन्स्टॉल करून घ्यावे २) त्यानंतर Mera e-kyc mobile app उघडल्यानंतर त्यामध्ये राज्य निवडून ठिकाण टाकावे ३) आधार क्रमांक टाकल्यानंतर जढ्ढ मोबाईला प्राप्त होईल सदर ओटीपी रखण्यात टाकावा ४) सदर माहिती भरल्यानंतर सबमिट बटनला क्लिक करावे त्यावेळी मोबाईल स्क्रीनवर दिसणारी माहिती व्हेरीफाईड व सबमिट करावी ५) त्यानंतर फेस श-झूल वर क्लिक करावे सेल्फी कॅमेरा उघडल्यावर डोळे उघडझाप करावे व फोटो काढून होताच ए-झूल पुर्ण झाली असा मेसेज येईल तरी सर्व रेशन कार्ड धारकांनी आपल्या पान २ वर

# राजर्षी शाहू शाळेत समारंभ!

कार्यक्रम: सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर प्राथमिक शाळेत इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभाग व विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण करण्यात आले.निरोप समारंभाचे आयोजन इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका चाटे बी.बी.यांच्या नियोजनानुसार शिक्षकांच्या मदतीने केले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी दयानंद प्रतिष्ठान केजचे सहसचिव तथा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री.अशोकराव डांगे तर प्रमुख उपस्थितीमध्ये शाळेतील



ज्येष्ठ शिक्षक श्री.यादव व्ही. बी.यांची उपस्थिती होती.प्रारंभी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला.वार्षिक स्नेह संमेलनामध्ये सहभागी सर्व विद्यार्थ्यांना तसेच शाळेतील विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना यावेळी बक्षीसाचे वितरण करण्यात आले.कार्यक्रम प्रसंगी सातवीच्या अनेक विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेत आलेले अनुभव खूप आत्मीयतेने सांगितले व शाळेतील शिक्षकांचे ऋण व्यक्त केले.त्यांनी दिलेली शिक्षणाची ही प्राथमिक शिदोरी आमच्या उर्वरित आयुष्याचा भक्कम पाया असल्याचे याप्रसंगी नमूद केले.यावेळी कु. अनुजा तिडके,कु. ज्ञानेश्वरी पान २ वर

# महापुरुष स्पर्धेचे पारितोषिक वितरण

जयभिम महोत्सव:विद्यार्थ्यांनी नोंदवला उत्स्फुर्त सहभाग



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये ४ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून गुरुवार (दि.३) एप्रिल रोजी महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तालुका पातळीचर घेण्यात आली होती. त्या परीक्षेला एकूण एक पान २ वर

**चेतन निसर्गंध**

## शिवशाही ही एक आदर्श राज्यव्यवस्था

# परळीत मूकनायक सन्मान सोहळा

पुण्यभूमी.प्रतिनिधी

परळी:छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हे सर्व जाती, धर्म आणि पंथाच्या लोकांसाठी तसेच महिलांसाठी समान न्यायाचे राज्य होते. त्यामुळे त्यांची राज्यव्यवस्था आजही एक आदर्श राज्यव्यवस्था म्हणून गणली जाते, असे महत्त्वपूर्ण विचार फुले-आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक चेतन निसर्गंध यांनी व्यक्त केले. ते परळी येथे आयोजित 'शिवशाहीचा प्रेरणादायी इतिहास व वर्तमान' या कार्यक्रमात बोलत होते.या कार्यक्रमाचे उद्घाटन परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक ढोणे यांनी महापुरुषांच्या इतिहासाची उजळणी करणे आणि त्याचे सतत स्मरण ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन केले.

सविस्तर वृत्त असे की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवनात छत्रपती प्रताप सिंह भोसले महाराज यांच्या १० एप्रिल १८१८ रोजी झालेल्या सातारा गादीवरील पुन:स्थापनेच्या स्मरणार्थ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान शहरातील उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम देऊन 'मूकनायक' पुरस्काराने गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे संजय सुरवसे हे होते. विचारमंचावर ज्येष्ठ पत्रकार धनंजय अरबुने, रामप्रसाद गरड, राजेश साबणे, ओम प्रकाश बुरांडे, परळी औद्योगिक विकास केंद्राचे उपकार्यकारी अभियंता श्रीकांत इंगळे, महापारेषणचे सुंदर आमले, बिभीषण लंकेश, चंद्रशेखर देशमुख, प्रशांत आल्टे, लक्ष्मण वैराळ, प्रा. प्रवीण फुटके, श्रीराम लांडगे, सम्राट गित्ते, अजय फड, आकाश देवरे, बाबा शेख, हरिभाऊ आगलावे , मयूर अरबुरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या धनंजय आढाव, रानबा गायकवाड, मोहन व्हावळे, बालाजी ढगे आणि महादेव शिंदे या पाच पत्रकारांना 'मूकनायक' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पान २ वर



# घरकुल योजनेचा महाभ्रष्ठाचार?

चर्चा:जिओ डॉगिंगच्या नावाखाली आडस सर्कल लाचलुचपत?



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:तालुक्यातील आडस सर्कल मध्ये घरकुल विभागाचे इंजिनिअर यांनी महाभ्रष्ठाचार करत आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे कारण घरकुल योजनेला एक तर शासनाचा निधी कमी आहे त्यांमध्ये घराचा पाया सुध्दा भरला जात नाही तेवढा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी घरकुल विभागाच्या इंजिनिअरला अंदाजे रक्कम २० हजार रुपये द्यावे लागतात त्यामुळे नागरिकांना काही मिळत नाही आणी नंतर घरकुल विभागाचे आडस इंजिनिअर सर्कला असणाऱ्या इंजिनिअर जिओ डॉगिंगसाठी पैशाची मागणी करत असल्याचे नागरिकांन मध्ये चर्चा सत्र सुरू झाले आहे पान २ वर